# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन    डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३८ | बुधवार, दि.२६ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# १.७० कोटींच्या घोषणांचा फुगा फुटला!

## जयस्तंभ चौक बसस्थानक आजही दुरावस्थेच्या गर्तेत

### आमदार विनोद अग्रवालांच्या 'सुशोभीकरणा'ची जुमलेबाजी उघडी?




नागरिकांना बसस्थानकाचे दाखविण्यात आलेले मॉडेल छायाचित्र.



आमदारांच्या घोषणेनंतरही दुरावस्थेत असलेले जयस्तंभ चौकातील बसस्थानकातील छायाचित्र.

**प्रचाराचा स्टंट की जनतेची दिशाभूल?**

**ज्या बस स्थानकावरून दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी आणि महिला प्रवास करतात, तिथे आज स्वच्छतेचा आणि मूलभूत सुविधांचा पुरता बोजवारा उडालेला आहे. पावसाळ्यात उघड्यावर उभे राहावे लागणे, दुर्गंधीयुक्त परिसर आणि खड्ड्यांचे साम्राज्य यामुळे प्रवासी त्रस्त झाले आहेत. १.७० कोटी रुपयांचा निधी नेमका कुठे गेला? की ही केवळ निवडणुकीच्या तोंडावर केलेली जुमलेबाजी होती? असा आक्रमक सवाल आता गोंदियातील जनता विचारत आहे.**

**गोंदिया:**-पोस्टरवर चकचकीत 'स्मार्ट बस स्टॉप', प्रत्यक्षात मात्र प्रवाशांच्या नशिबी चिखल, खड्डे आणि दुर्गंधी! एक वर्ष उलटले तरी काम ठप्प; गोंदियाकरांचा संतप्त सवाल: "घोषणांचा पाऊस पाडणारे आमदार महोदय, काम कधी सुरू होणार?"

"अब बदलेगा गोंदिया का चेहरा!" आणि "यह बस स्टॉप नहीं, हमारा शहर बदलने की शुरुआत है!" अशा गोंडस अन... आकर्षक ओळी लिहून सोशल मीडियावर मोठमोठे पोस्टर्स झळकावणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या घोषणा हवेतच विरल्याचे विदारक चित्र आज गोंदिया शहरात पाहायला मिळत आहे. गोंदियातील अतिशय महत्त्वाच्या आणि मध्यवर्ती जयस्तंभ चौकातील बसस्थानकाचे १ कोटी ७० लाख रुपयांच्या निधीतून अत्याधुनिक सुशोभीकरण करण्याची भंपक घोषणा करून तब्बल एक वर्षाचा कालावधी लोटला, मात्र आजही हे बसस्थानक आपल्या दयनीय अवस्थेवर अश्रू ढाळत उभे आहे.

आमदार विनोद अग्रवाल यांनी वर्षभरापूर्वी मोठ्या दिमाखात प्रचार-प्रसिद्धीचा नारळ फोडत जयस्तंभ चौक बसस्थानकाच्या नूतनीकरणाची घोषणा केली होती. आधुनिक वास्तुशिल्पीय डिझाइन, स्वच्छ व सुंदर प्रतीक्षालय, अत्याधुनिक महिला/पुरुष व दिव्यांगांसाठी शौचालये, शुद्ध पेयजल, डिजिटल सूचना बोर्ड, सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणा आणि हरित सौंदर्यीकरणाची रंगीत स्वप्ने गोंदियाच्या जनतेला दाखवण्यात आली होती. पोस्टरवर थ्रीडी डिझाईनचे चित्ताकर्षक फोटो छापून स्वतःचा मउदो उदोफ करून घेण्यात लोकप्रतिनिधी आणि त्यांचे कार्यकर्ते कमालीचे यशस्वी ठरले. परंतु, या बातमीला वर्ष उलटूनही प्रत्यक्ष जागेवर एक विटासुद्धा रचली गेलेली नाही.

**नागरिकांमधून संतापाची लाट: "आमच्या तोंडाला पाने पुसणे बंद करा!"**

**वर्षभरात या प्रकल्पाबाबत लोकप्रतिनिधींनी एक शब्दही न उच्चारल्यामुळे नागरिकांमधील असंतोष शिगेला पोहोचला आहे. "आम्हाला कागदी नकाशे आणि सोशल मीडियावरील डिझाईन्स नकोत, प्रत्यक्ष काम दाखवा!" असा थेट इशारा आता गोंदियातील संतप्त जनता देत आहे. जाहिरातबाजीतून स्वतःची पाठ थोपटून घेणाऱ्या लोकप्रतिनिधींना आता या उघड्या पडलेल्या आश्वासनांवर उत्तर देणे कठीण होऊन बसले आहे.**

**आता तरी संबंधित लोकप्रतिनिधी आणि प्रशासन निद्रिस्त अवस्थेतून जागे होऊन या कामाला प्रत्यक्षात सुरुवात करणार, की गोंदियाकरांना अजूनही अशाच पोकळ घोषणांचा मारा सहन करावा लागणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

## नक्षल प्रोत्साहन भत्त्याच्या थकीत बिलासाठी ७ हजारांची लाच घेणारे गोंदियातील दोन कर्मचारी 'एसीबी'च्या जाळ्यात

**गोंदिया:**-नक्षल प्रोत्साहन भत्त्याचे थकीत बिल (एरियस) मंजूर करून देण्यासाठी सात हजार रुपयांची लाच मागणारे आणि ती स्वीकारणारे गोंदियातील जिल्हा हिवताप कार्यालयाचे दोन कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) जाळ्यात अडकले आहेत. नागपूर एसीबीच्या पथकाने २४ ऑगस्ट रोजी सापळा रचून ही धडक कारवाई केली.

मारुती यादव दिपेवाड (वय ३९, आरोग्य सेवक, मूळ रा. नांदेड, ह.मु. गोंदिया) आणि नीरजकुमार नरेश अग्रवाल (वय ४०, वरिष्ठ लिपिक, रा. गोंदिया) अशी लाचखोर कर्मचाऱ्यांची नावे असून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया गोंदिया शहर पोलीस ठाण्यात सुरू आहे.

तक्रारदाराचे वडील जिल्हा हिवताप विभागात आरोग्य सेवक म्हणून २०१६ मध्ये सेवानिवृत्त झाले होते. फेब्रुवारी २०२६ मध्ये त्यांचे निधन झाले. मार्च २०२६ मध्ये तक्रारदार आईच्या कुटुंब निवृत्तीवेतनाचे काम घेऊन कार्यालयात गेले असता, वरिष्ठ लिपिक नीरजकुमार अग्रवाल यांनी वडिलांचे नक्षल प्रोत्साहन भत्त्याचे थकीत बिल काढून देण्यासाठी ६ हजार रुपयांची लाच मागितली. पुढे जून २०२६ मध्ये अग्रवाल यांनी तक्रारदाराला आरोग्य सेवक मारुती दिपेवाड यांना भेटण्यास सांगितले. दिपेवाड यांनी बिलासाठी ७ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली.तक्रारदाराची लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने त्यांनी २४ ऑगस्ट रोजी गोंदिया एसीबी कार्यालयात धाव घेऊन तक्रार नोंदवली.

तक्रारीच्या आधारे एसीबी पथकाने पंचांसमक्ष पडताळणी केली. यात मारुती दिपेवाड यांनी लाच मागून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे आणि नीरजकुमार अग्रवाल यांनी त्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर रचलेल्या सापळ्यात दिपेवाड यांना ७ हजारांची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले, तर कार्यालयात हजर असलेल्या अग्रवाल यांनाही तात्काळ ताब्यात घेण्यात आले.

ही कारवाई नागपूर एसीबीच्या पोलीस अधीक्षक माधुरी बाविस्कर, अप्पर पोलीस अधीक्षक विजय म ाहुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक निलेश लोधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. शासकीय कामासाठी कोणत्याही लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी न घाबरता एसीबीशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेला ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**गोंदिया :**- माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या कार्याला अभिवादन म्हणून २१ ऑगस्ट रोजी राज्यभर ङ्गजलसंधारण दिनफ साजरा करण्यात आला. यानिमित्त मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या ङ्गमहा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटरफ आणि ङ्गमृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेफला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या स्पर्धेसाठी यापूर्वी १९ ऑगस्ट २०२६ पर्यंत रील्स अपलोड करण्याची मुदत निश्चित करण्यात आली होती. परंतु नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाची दखल घेत मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेसाठी रील्स अपलोड करण्याची मुदत आता ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

मृद व जलसंवर्धनाबाबत नागरिक, विद्यार्थी आणि युवकांमध्ये जनजागृती व्हावी, तसेच या विषयाशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने रील्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

## गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची नोकर पदभरती रद्द करा

**गोंदिया:**- जिल्हा मध्यवर्तीसहकारी बैंक मर्यादित अंतर्गत नुकत्याच करण्यात आलेल्या नोकर पदभरतीमध्ये आरक्षणाचे पालन न करता सरळ सेवा पदभरती घेण्यात आल्याने ही नोकर पदभरती तात्काळ रद्द करण्यात यावी अशी मागणी आरक्षण बचाव संघ सडक अर्जुनीच्यावतीने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

दि गोंदिया डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव बँक लिमिटेड मार्फत २५ जानेवारी २०२५ ला नोकर पदभरती संबंधाने सरळ सेवा भरती करण्यासाठी ऑनलाइन जाहिरात देण्यात आली होती. यात द्वितीय श्रेणी अधिकारी जनरल मॅनेजर ५ पदे, कनिष्ठ लिपीक ४५ पदे व शिपाई २५ पदे असे एकूण ७७ पदांची पदभरतीची जाहिरात देण्यात आली होती. मात्र या जाहिरातीमध्ये आरक्षणाच्या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचा आरोप समितीने केला आहे. सहकारी बँकेमध्ये नोकर पदभरती प्रक्रिया लोकहितार्थ व पारदर्शक होण्याच्या दृष्टीने राबविण्याची जबाबदारी बँकेची राहील असे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे शासन परिपत्रक असून महाराष्ट्र शासनाने भारतीय संविधानानुसार आरक्षण अधिनियम २००१ पारित केला आहे.

या अधिनियमानुसार अनुसूचित जाती, जमाती व ओबीसी प्रवर्गातील लोकसेवक व पदे यामध्ये समांतर आरक्षण दिले आहे. तर एससी, एसटी, ओबीसी यांना आरक्षित रोजगारापासून वंचित रहावे असल्याचे अनुसूचित लागत राष्ट्रीय जाती आयोगानेही शासनास कळिवले आहे.

तसेच विधी व न्याय विभागाचे अभिप्राय व सामान्य प्रशासन विभागाच्या २५ मे २००४, २६ ऑक्टोबर २००४, ५ नोव्हेंबर २००९ व १६ फेब्रुवारी २०२१ च्या सूचनांचे पालन करून आरक्षण अधिनियम, २००१ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे शासनाने कळिवले आहे. मात्र गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आरक्षणाचे पालन न करता नौकर पदभरती केल्याने एससी, एसटी, ओबीसी व इतर मागास घटकावर अन्याय झाला असून सदर नोकर पद भरती तात्काळ रद्द करावी अशी मागणी सडक अर्जुनी तालुक्यातील आरक्षण बचाव संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.

तालुका आरक्षण बचाव संघ समितीचे कार्यकर्ते भोजराज रामटेके, हंसराज राऊत, सुधाकर कुर्वे, महेंद्र चंद्रिकापुरे, जितेंद्र शहारे, पुरुषोत्तम रामटेके, रोशन बडोले, महादेव जांभुळकर, आर्वी मेश्राम, विवेकानंद येरावत, प्रज्चल तागडे, दिनेश हुकरे, निखिल शहारे, हरणीला नंदागवळी, देवांगना फुल्लके, आशिष राऊत, एकनाथ कीर्तन, आकाश रामटेके, दीपक वंजारी, मंगेश मोहरले, रोहित जनबंधू, गौरव गाते, अमित बनसोड, अर्जुन घरोटे यांचा समावेश आहे.

# एमआयडीसीच्या जागेवर राईस मिलशिवाय मोठ्या उद्योगांची वाणवा; निम्याहून अधिक भूखंड ओसाड

- जिल्ह्यातील एमआयडीसीत निम्याहुन अर्धे भुखंड रिकामे ताब्यात
- गोदिया जिल्ह्याला खनिजावर आधारीत उद्योगाची गरज




**तालुकास्तरीय एमआयडीसींची बिकट अवस्था**

**गोंदिया (मुंडीपार): १४६.१४ हेक्टरवरील २११ भूखंडांपैकी १०४ वरच उद्योग सुरू आहेत. धानाच्या कोंड्यापासून वीजनिर्मिती करणारा प्रकल्प आणि मकिटप्लायफ सारख्या मोठ्या कंपन्या गेल्या एक-दोन दशकांपासून बंद पडल्या आहेत.**

**देवरी: १५५.९९ हेक्टरवर १२७ विकसित भूखंडांपैकी केवळ २६ प्रकल्पांमधून उत्पादन सुरू आहे. इथेनॉल व मॅगनीज प्रकल्प वगळता उर्वरित जागेवर महाविद्यालये, खाजगी संस्था व रिकामी गोदामे उभी आहेत.**

**तिरोडा: २१०.४० हेक्टरची संपूर्ण जागा अदानी प्रकल्पाला दिल्याने २००९ मध्ये अतिरिक्त १७१.७६ हेक्टर जागा मंजूर करण्यात आली; मात्र तेथे नवीन उद्योगांचा पत्ता नाही.**

**गोरेगाव व अर्जुनी मोरगाव: हिरडामाली (गोरेगाव) येथील २८ पैकी अवघ्या ६ भूखंडांवर, तर अर्जुनी मोरगावमधील ५२ पैकी केवळ २ भूखंडांवरच लघुउद्योग धडपडत सुरू आहेत.**

**गोंदिया:**- विपुल खनिज, मुबलक पाणी, रेल्वेचे जाळे आणि विमानतळाची सुविधा... औद्योगिक विकासासाठी आवश्यक असणारे सर्व अनुकूल घटक उपलब्ध असूनही गोंदिया जिल्हा मात्र मोठ्या उद्योगांपासून पारखाच राहिला आहे. कधी काळी गोंदियात सुरू होणारा प्रस्तावित स्टील कारखाना बिडी उद्योग वाचविण्याच्या नावाखाली भिलाई येथे हलवण्यात आला, तेव्हापासून सुरू झालेला औद्योगिकीकरणाचा अनुशेष आजही कायम आहे. राजकीय अनास्था आणि लोकप्रतिनिधींच्या अपयशामुळे ३० वर्षांनंतरही जिल्ह्यातील एमआयडीसींमध्ये बहुतांश भूखंड ओसाड पडले असून मराईस मिलफ व्यतिरिक्त मोठ्या उद्योगांची प्रचंड वाणवा दिसून येत आहे.

जिल्ह्यात ७०६ हेक्टर क्षेत्रात औद्योगिक वसाहती पसरलेल्या आहेत. यासाठी ४३० विकसित भूखंड तयार करण्यात आले. त्यापैकी ३४३ भूखंडांचे वाटप झाले असले, तरी प्रत्यक्षात फक्त १५० भूखंडांवरूनच उत्पादन सुरू आहे.

आजघडीला ४४.६८ हेक्टर जागा वाटपासाठी पडून आहे. तिरोड्यातील अदानी वीज प्रकल्प आणि देवरीतील मसुफलामफ इथेनॉल प्रकल्प वगळता जिल्ह्यात एकही मोठा उद्योग उभा राहिलेला नाही.अदानी समुहाव्यतिरिक्त इतर उद्योदकांनी या जिल्ह्याकडे पाहिले नाही, आपले लक्ष घातलेले नाही, हे या जिल्ह्यातील सत्ताधारी व विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींचेच अपयश म्हणावे लागणार आहे.तर गोंदियातील डोंगरगाव परिसरात नवीन अतिरिक्त एमआयडीसीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे

औद्योगिक विकासाच्या नावाखाली महामंडळाने ३० वर्षांपूर्वी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. सालेकसा, आमगाव, सडक अर्जुनी या ठिकाणी एमआयडीसीच्या नावाखाली केवळ बोर्ड लावण्याव्यतिरिक्त काहीही झालेले नाही. शेतीवर अवलंबून असलेल्या या जिल्ह्यात स्थानिक युवकांना रोजगार न मिळाल्याने स्थलांतर वाढले आहे. नक्षलग्रस्त भागाचा विकास केवळ उद्योगांच्या माध्यमातूनच शक्य असल्याचे दावे प्रशासन करते; मात्र प्रत्यक्षात खनिजावर आधारित उद्योग आणण्यात यंत्रणा साफ अपयशी ठरली आहे.

## सचिव डवले यांच्याशी चर्चा; निमगाव प्रकल्पाला गती मिळणार

**गोंदिया:**तिरोडा-गोरेगाव विधानसभा क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या व महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या निमगाव (आंबेनाला) प्रकल्पाच्या वन वळतीकरणाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण व्हावी आणि प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला गती मिळावी, यासाठी प्रशासकीय स्तरावर हालचाली तीव्र झाल्या आहेत. यासंदर्भात आज मुंबई येथे महाराष्ट्र राज्य जलसंपदा विभागाचे सचिव एकनाथ डवले यांची भेट घेऊन आमदार विजय रहांगडाले यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेतला.

निमगाव (आंबेनाला) प्रकल्प हा या परिसरातील शेती आणि नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न मिटवण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. मात्र, वन वळतीकरणाची प्रक्रिया प्रलंबित असल्याने पुढील कार्यवाहीत अडथळे येत होते. आज झालेल्या बैठकीत या प्रकल्पाची सद्यस्थिती, प्रलंबित मुद्दे आणि वन वळतीकरणाच्या प्रक्रियेतील तांत्रिक व प्रशासकीय अडचणींवर सचिव डवले यांच्याशी सखोल चर्चा झाली.संबंधित विविध विभागांमध्ये सुयोग्य समन्वय साधून ही वन वळतीकरणाची प्रक्रिया तातडीने मार्गी लावावी, जेणेकरून प्रकल्पाचे काम विनाविलंब सुरू करता येईल, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.जलसंपदा विभागाचे सचिव एकनाथ डवले यांनी संपूर्ण विषयाचे गांभीर्य लक्षात घेत, प्रकल्पाच्या आढाव्यानंतर आवश्यक ती सर्व प्रशासकीय कारवाई प्राधान्याने करण्याबाबत अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

## बिलासपूर-येलहंका-बिलासपूर साप्ताहिक गाडीला हिरवी झेंडी

### २६ ऑगस्टपासून गोंदिया-बल्लारशा मार्गे धावणार : प्रफुल्ल पटेल यांच्या पाठपुराव्याला यश



**गोंदिया :** हावडा-मुंबई मार्गावरील गोंदिया रेल्वे स्थानक हे एक रेल्वे महत्त्वपूर्ण स्थानक असून या रेल्वे स्थानकावरून दररोज ४५ तर गाड्या प्रवासी धावतात. तसेच येथूनच गोंदिया-बल्लारशा मार्ग गेला आहे. या मार्गावर पॅसेंजर व दोन एक्स्प्रेस गाड्या धावतात. यात आता आणखी एका साप्ताहिक एक्स्प्रेस गाडीची भर पडली आहे. बिलासपूर येलहंका-बिलासपूर ही नवीन साप्ताहिक रेल्वे गाडी सुरू होणार आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना अधिक सोयीचे होणार आहे.

गोंदिया-बल्लारशा मार्गावर सध्या ४ पॅसेंजर गाड्या आणि दोन एक्स्प्रेस धावतात. या मार्गावर एक्स्प्रेस गाड्यांची संख्या कमी असल्याने प्रवाशांची गैरसोय होत होती. त्यामुळे या मार्गावर एक्स्प्रेस

गाड्या वाढविण्याची मागणी प्रवाशांनी खा. प्रफुल्ल पटेल यांच्याकडे केली होती. त्याचीच दखल घेत खा. पटेल यांनी रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव व रेल्वे बोर्डाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर या मार्गावर नवीन साप्ताहिक गाडी सुरु करण्यास रेल्वे बोर्डाने मंजुरी दिली आहे. ही नवीन साप्ताहिक रेल्वे गाडी २६ ऑगस्टपासून दर बुधवारी सायंकाळी ६:१५ वाजता बिलासपूर येथून सुटून गोंदिया येथे पोहोचेल व पुढे बल्लारशा मार्गे येलहंका दिशेने रवाना होईल. तसेच येलहंका येथून परतीच्या प्रवासात बल्लारशा-चांदाफोर्ट मार्गे ही गाडी २७ ऑगस्ट रोजी रात्री ९:५० वाजता गोंदिया येथे पोहचणार आहे.

या नवीन रेल्वे गाडीमुळे गोंदिया जिल्ह्यातील प्रवासी, व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. बिलासपूर, गोंदिया, चंद्रपूर, बल्लारशा यांसह विविध भागांमध्ये प्रवास करणाऱ्या नागरिकांना अतिरिक्त रेल्वे सुविधा उपलब्ध होणार असून जिल्ह्याची रेल्वे कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील प्रवाशांना या रेल्वेचा लाभ होणार असल्याने प्रवासी व नागरिकांनी खा. प्रफुल्ल पटेल यांचे आभार मानले

# गोंदियात १०० एकरावर उभारणार कंटेनर पार्क; उद्योगमंत्री उदय सामंत यांची घोषणा

### एमआयडीसीतील गैरवापर व पडून असलेल्या २३ भूखंडांवर कारवाई; १५ कोटींचा निधी मंजूर

**गोंदिया:**- धान उत्पादक जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यातून दरवर्षी तब्बल दोन हजार कोटी रुपयांचा तांदूळ परदेशात निर्यात केला जातो. येथील तांदूळ गिरणी उद्योगाला बळ देण्यासाठी आणि मालवाहतूक अधिक सुलभ करण्यासाठी एमआयडीसीत १०० एकर जागेवर मकंटेनर पार्कफ उभारण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील एमआयडीसीतील उद्योगांचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली."गोंदिया जिल्ह्यात धानावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना मोठी संधी आहे," असे सांगून सामंत पुढे म्हणाले, "येथील उद्योजकांनी कंटेनर पार्कची मागणी केली होती. त्यासाठी आवश्यक १०० एकर जागा उपलब्ध करून दिली जाईल.

सध्या उपलब्ध जागेचा आढावा घेऊन कमीत कमी जागेत हे पार्क कसे सुरू करता येईल, याचा अभ्यास केला जाईल. तसेच एमआयडीसीत मूलभूत सुविधांच्या विकासासाठी उद्योजकांनी मागितलेला १५ कोटी रुपयांचा निधी लवकरच वितरीत केला जाईल."



**निष्क्रिय २३ भूखंड अखेर ताब्यात**

**उद्योग उभारणीच्या नावाखाली भूखंड मिळवूनही वर्षानुवर्षे ते पडून ठेवणाऱ्यांविरोधात प्रशासनाने बडगा उगारला आहे. गेल्या ५ ते ६ वर्षांपासून उद्योग सुरू न करणाऱ्या २३ उद्योजकांना नोटिसा बजावून त्यांचे भूखंड ताब्यात घेण्यात आले आहेत. हे भूखंड आता नवीन व इच्छुक उद्योजकांना वाटप केले जातील, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.**

**न्यायालयीन वादातून जमिनी सोडवणार**

**एमआयडीसीच्या प्रस्तावित अनेक जमिनी कायदेशीर वादात अडकल्या आहेत. या जागा लवकरात लवकर न्यायालयातून मुक्त करून तिथे नवे उद्योग उभारले जातील.**

# नागपूरच्या अधिकाऱ्यांच्या हाती गोंदिया हिरकणी कक्ष घोटाळ्याचा तपास

**गोंदिया:**-:गोंदिया जिल्ह्यातील हिरकणी कक्ष उभारणीतील कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराची चौकशी आता एका नव्या वळणावर आली आहे. तब्बल २ कोटी २८ लाख रुपयांच्या १८ हिरकणी कक्ष बांधकाम घोटाळ्यात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनिकर यांच्या निलंबनाची मागणी माजी आमदार राजकुमार बडोले यांनी महिला व बाल विकास मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली होती.विशेष म्हणजे सदर घोटाळा मटाने उघडकीस आणलेला होता.या घोटाळ्यातील गैरव्यहाराची तक्रार मुख्यमंत्री,महिला बालविकास मंत्री व आयुक्तांकडे सुध्दा करण्यात आलेली होती.त्या तक्रारीच्या चौकशीसाठी महिला व बाल विकास विभाग नागपूर विभागीय कार्यालयाने ५ सदस्यीय समिती गठित केली असून, समितीला ८ दिवसांत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.मात्र ही समिती अद्याप गोंदिया जिल्ह्यातील १८ हिरकणी कक्षाच्या जागेवर तपासणी करण्याकरीता पोचलेलीच नाही.त्यातही पौनीकर यांना निलबिंत करण्यात न आल्याने विभागाचे वरिष्ट अधिकारीही यात सहभागी तर नसावे ना अशी शंका निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे या घोटाळ्याच्या चौकशीकरीता नागपूर विभागातील अधिकारी यांना वगळून इतर विभागातील अधिकारी व स्थानिक जिल्ह्यातील जिल्हा नियोजन अधिकारी यांना चौकशीत सामावून घ्यायला हवे होते.

मात्र, विभागीय चौकशी समितीत नागपूर येथील अधिकाऱ्यांचाच भरणा असल्याने आणि संशयित अधिकारीही नागपूर निवासी असल्याने ही चौकशी खरोखरच निष्पक्ष होईल का, असा गंभीर प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

गोंदिया जिल्ह्यात महिला व बाल विकास विभागामार्फत उभारण्यात आलेल्या १८ हिरकणी कक्षांच्या बांधकामात २ कोटी २८ लाख रुपयांचा मोठा गैरव्यवहार झाल्याचे मटाने पुराव्यानिशी उघडकीस आणले होते.यावर विधानसभेत आमदार इंजि.राजकुमार बडोले व विधानपरिषदेत आमदार डॉ.परिणय फुके यांनी मुद्दा उपस्थित करुन चौकशीची मागणी केलेली होती.तसेच वृत्ताच्या आधारे माजी आमदार राजकुमार बडोले यांनी ३ जून २०२६ रोजी राज्य सरकारकडे तक्रार केली होती.या घोटाळ्याप्रकरणी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनिकर यांच्यावर थेट ठपका ठेवत त्यांना तात्काळ निलंबित करून सखोल चौकशीची मागणी करण्यात आली होती.




**पालकमंत्र्याच्या निर्देशाकडे जिल्हाधिकाऱ्यांचा कानाडोळा**

**एकीकडे गोंदियाचे पालकमंत्री इंद्रनिल नाईक यांनी जुर्ले महिन्यात पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीमध्ये आमदारांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या आधारे जिल्हाधिकारी यांना चौकशी समिती गठित करण्याचे निर्देश दिले होते.परंतु २५ दिवसाचा कालावधी लोटूनही जिल्हाधिकारी गोंदिया यांनी चौकशी समिती गठित का केली नाही हा संशोधनाचाच नव्हे तर चर्चेचा विषय झालेला आहे.**

**अशी आहे नवी चौकशी समिती**

**चौकशीसाठी नेमलेल्या समितीमध्ये: श्रीमती भारती मानकर (बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी नागपूर शहर पश्चिम) - अध्यक्ष, अनिल चव्हाण (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वर्ग-२, नागपूर विभाग) - सदस्य,सतीश गोसावी (लेखा अधिकारी, नागपूर विभाग) - सदस्य,श्रीमती अमिता खोब्रागडे (विधी सल्लागार, भंडारा)- सदस्य,एम. बी. राठोड (वरिष्ठ लिपिक, नागरी नागपूर शहर पश्चिम) - सदस्य यांचा समावेश आहे.**

## संपादकीय

### शाळा की कुंभमेळा? ३४ हजार कोटींचा यक्षप्रश्न!

आपल्या देशात शिक्षणासाठीचा निधी कमी पडतो, ग्रामीण भागातील शाळांच्या भिंती कोसळतात, शिक्षकांच्या जागा वर्षांनुवर्षे रिक्त राहतात आणि दुसरीकडे एका तात्पुरत्या धार्मिक सोहळ्यासाठी ३४ हजार कोटी रुपयांची उधळपट्टी केली जाते हा विरोधाभास आज देशाच्या अर्थकारणाला आणि भविष्याला लागलेली मोठी कीड आहे. 'बेरार टाईम्स' आज अत्यंत परखडपणे हा सवाल उपस्थित करत आहे की, आपल्याला खरोखरच भविष्यातील सुजाण नागरिक घडवणाऱ्या शाळांची गरज आहे की हजारो कोटींची राखरांगोळी करणाऱ्या कुंभमेळ्यांची?

संत तुकाराम महाराजांपासून ते महात्मा जोतीराव फुले आणि कुसुमाग्रजांपर्यंत अनेकांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि अशा मोठ्या धार्मिक आयोजनांमधील त्रुटींवर वेळोवेळी ताशेरे ओढले आहेत. "आली सिंहस्थ पर्वणी, न्हाव्या भटा झाली धणी" या तुकोबांच्या उक्तीपासून ते "व्यर्थ गेला तुका..." या कुसुमाग्रजांच्या कवितेपर्यंत संतांनी आणि विचारवंतांनी समाजाला सातत्याने भानावर आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, आज आपण २१ व्या शतकात जगतानाही त्याच कुप्रथांना भव्य दिव्य स्वरूप देऊन शासकीय तिजोरी उघडी करत आहोत.

वैद्यकीय आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, एकाच वेळी करोडो लोकांनी नदीच्या पात्रात उतरल्याने जलप्रदूषणाचा आणि महासाथीच्या आजारांचा मोठा धोका निर्माण होतो. गुदद्वारातून पसरणारे E.coli, Salmonella यांसारखे जिवाणू असोत किंवा कातडीचे दुर्धर आजार पसरवणारे जंतू असोत; तीर्थक्षेत्राच्या नावाखाली अस्वच्छतेची आणि जंतूंची देवाणघेवाण करणे हा आरोग्याशी थेट खेळ आहे. ज्या गोदावरीला आपण लोकमाता मानतो, त्याच नदीत तात्पुरते संडास, सांडपाणी आणि मानवी विष्ठा मिसळून तिचा नाला करणे आणि त्यातच श्रद्धेची डुबकी मारणे हा निसर्गाचा आणि नदीचा बळी देणे नाही का?

अर्थशास्त्राच्या नजरेतून पाहिले तर, कुंभमेळ्याच्या नावाने होणारी हजारो कोटींची उलाढाल ही अत्यंत तात्पुरती असते. त्यात ना कायमस्वरूपी रोजगाराची निर्मिती होते, ना देशाच्या पायाभूत सुविधांचा खरा विकास होतो. उलटपक्षी, चिनी बनावटीच्या वस्तूंची विक्री आणि गरिबांच्या खिशाला पडणारे भगदाड एवढाच याचा परतावा असतो. ३४,००० कोटी रुपयांचा निधी जर महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणावर, नवीन आधुनिक शाळा उभारण्यावर, हजारो तरुण शिक्षकांच्या कायमस्वरूपी भरतीवर आणि शिक्षकांच्या बिगर-शैक्षणिक कामांचा ताण कमी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यावर खर्च झाला, तर देशाचे चित्र बदलू शकते.

प्रयागराजच्या महाकुंभानंतर आता पुन्हा नाशकातील गोदावरीला संकटात ढकलण्यापेक्षा आणि झाडांची कत्तल करण्यापेक्षा, सरकारने या अथांग निधीचा वापर शिक्षण आणि आरोग्यासारख्या मूलभूत गरजांवर करायला हवा. 'Qmgw_{ZP_' (Transhumanism) चा विचार मांडतो की मानवी प्रयत्न हे विज्ञानाच्या आणि प्रगतीच्या दिशेने असायला हवेत. केवळ एका नदीत डुबकी मारल्याने पापक्षालन होते आणि सात पिढ्या उद्धरतात या कर्मकांडातून बाहेर पडून, नव्या पिढीला ज्ञान, तंत्रज्ञान आणि उत्कृष्ट शिक्षण देणे हीच खरी राष्ट्रसेवा ठरेल.

सरकारकडे प्रचंड बहुमत आहे; त्यामुळे अशा वेळी कुंभमेळ्यापेक्षा शिक्षणाला प्राधान्य देणारा ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेणे सहजासहजी शक्य आहे. आता प्रश्न एवढाच उरतो की, आपले राज्यकर्ते संतांचा आणि विज्ञानाचा विवेक स्वीकारून शाळा समृद्ध करणार, की कुंभमेळ्याच्या भव्यतेत देशाचे भविष्य वाहून जाऊ देणार?

# अर्जुनी मोरगावच्या दुर्गम भागात आरोग्य यंत्रणा बळकट करणार

- 'एकात्मिक आरोग्यवर्धिनी' समितीच्या बैठकीत आमदारांचे निर्देश
- माझं गाव-आरोग्य संपन्न गाव मोहिमेसह सिकलसेल व कर्करोग तपासणीवर १०० टक्के भर



**अर्जुनी मोरगाव:** -अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील अत्यंत दुर्गम व जंगलव्याप्त भागातील नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्य सेवा मिळावी यासाठी आरोग्य यंत्रणेचे सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर आमदार राजकुमार बडोले यांच्या अध्यक्षतेखाली अर्जुनी मोरगाव तहसील कार्यालयात मएकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीफची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे बळकट करून ममाझं गाव-आरोग्य संपन्न गावफ ही मोहीम लोकसहभागातून प्रभावीपणे राबवण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

अर्जुनी मोरगाव मतदारसंघांतर्गत सडक अर्जुनी, मोरगाव अर्जुनी आणि गोरेगाव तालुक्यातील गावे येतात. या सर्व भागांत आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी शासकीय योजनांचा आढावा घेण्यात आला. माता-बाल आरोग्य, नियमित लसीकरण तसेच प्रतिबंधात्मक सेवा तळागाळातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याचे स्पष्ट निर्देश आमदारांनी प्रशासनाला दिले.या सभेला दोन्ही तालुक्यांच्या सभापती आम्रपाली डोंगरवार व चेतन वळगाये, जिल्हा परिषद सदस्या रचनाताई गहाणे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे व इंद्रायणी गोमासे, बीडीओ सारीपुत्र धोटे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुकन्या कांबळे, डॉ. प्रणित पाटील, डॉ. विनोद चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

तीन तालुक्यांतील आरोग्य यंत्रणेचा आढावा

मोरगाव अर्जुनी: २ ग्रामीण रुग्णालये, ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४३ उपकेंद्रे, १ आपला दवाखाना व १ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र अशा एकूण ५४ आरोग्य संस्थांमार्फत रुग्णसेवा सुरू आहे.

सडक अर्जुनी: २ ग्रामीण रुग्णालये, ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३० उपकेंद्रे व १ आपला दवाखाना अशा एकूण ३८ संस्था कार्यरत आहेत.

**गोरेगाव तालुका:** मतदारसंघातील २ प्राथमिक आरोग्य केंद्रांद्वारे सेवा दिली जात आहे.

**तपासणी अन... जनजागृतीवर विशेष भर**

बैठकीत बोलताना आमदार राजकुमार बडोले यांनी सांगितले की, आदिवासी व दुर्गम भागात सुरुवातीच्या टप्प्यातच सिकलसेल, कर्करोग, उच्च रक्तदाब आणि मधुमेहाची १०० टक्के तपासणी होणे आवश्यक आहे. यासाठी वैद्यकीय पथकांचे नियोजन करण्यात येईल व प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल.

याशिवाय समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची रिक्त पदे, शाळांमधील आरबीएस (RBSK) पथकामार्फत तपासणी, कुपोषित बालकांवर उपचार, रुग्णवाहिकांचे इंधन व आरोग्य केंद्रांच्या वीज बिलांचे प्रश्न लवकरात लवकर सोडविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# धानाच्या प्रदेशाला ऊसाचा आरसा का दाखविला?

## पश्चिम महाराष्ट्राच्या सहकारातून धडा आणि पूर्व विदर्भाच्या धानाधारित विकासाची हरवलेली संधी

अ‍ॅड.लखनसिंह कटरे,
(निवृत्त डीडीआर)
बोरकन्हार(झाडीपट्टी)-४४१९०२,
ता.आमगांव, जि.गोंदिया,
(पूर्व विदर्भ-महाराष्ट्र)

**प्रस्तावना : प्रश्न पिकाचा नाही, विकासदृष्टीचा आहे**

महाराष्ट्राच्या विकासाचा इतिहास पाहताना पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ यांच्यातील आर्थिक विषमता, औद्योगिक विकास, शेतीची रचना आणि सहकाराची वाटचाल यांचा तुलनात्मक अभ्यास केल्याशिवाय महाराष्ट्राच्या प्रादेशिक विकासाचे वास्तव समजून घेता येत नाही.

मी हा विषय केवळ आकडेवारीच्या आधारे मांडत नाही. माझ्या अनुभवातून आणि या प्रदेशाकडे दीर्घकाळ पाहताना मला जाणवलेला हा एक मूलभूत प्रश्न आहे एखाद्या प्रदेशाच्या विकासासाठी त्या प्रदेशाच्या स्वतःच्या भौगोलिक, हवामानिक, कृषी आणि सामाजिक वैशिष्ट्यांचा आधार घेतला जातो की दुसऱ्या प्रदेशाचा यशस्वी नमुना जसाच्या तसा उचलून आणला जातो?

माझ्या मते, पूर्व विदर्भाच्या विकासाच्या संदर्भात हीच सर्वांत मोठी चूक झाली. पश्चिम महाराष्ट्राने, सर्वंकष अशा शाश्वत व सम्यक विकासाचा मूलमंत्र असलेल्या परिसर वैशिष्ट्यांचा विकास/Develoment of Like of the Area या शाश्वत सूत्रानुसार आपल्या प्रदेशाची वैशिष्ट्ये ओळखली. उसाची शेती, सिंचन, शेतकरी संघटन, सहकारी संस्था, साखर कारखाने, सहकारी बँका, शिक्षणसंस्था आणि स्थानिक नेतृत्व यांना एका परस्परपूरक आर्थिक साखळीत बांधण्याचा प्रयत्न झाला. या प्रक्रियेत निर्माण झालेल्या संस्थात्मक क्षमतेचे एक महत्त्वाचे प्रतीक म्हणजे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट.

परंतु पूर्व विदर्भात परिस्थिती वेगळी होती. विशेषतः गोंदिया, भंडारा आणि लगतच्या प्रदेशात धान हे केवळ एक पीक नव्हते; ते संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार होते.

गोंदिया जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत माहितीनुसार जिल्ह्यातील मुख्य कृषी उत्पादन धान आहे आणि मोठ्या संख्येने तांदूळ गिरण्या असल्यामुळे गोंदिया शहराला "Rice City' म्हणून ओळखले जाते.

मग माझ्या मनात प्रश्न निर्माण होतो जर ऊस उत्पादक प्रदेशासाठी ऊसाच्या संपूर्ण मूल्यसाखळीचा वैज्ञानिक अभ्यास करणारी संस्था निर्माण होऊ शकते, तर धान उत्पादक प्रदेशासाठी धानाच्या संपूर्ण मूल्यसाखळीचा अभ्यास करणारी संस्था, पूर्व विदर्भातील धान पट्ट्यात का उभी राहू शकली नाही?

हा प्रश्न कोणत्याही एका व्यक्तीविरुद्ध किंवा राजकीय पक्षाविरुद्ध आरोप म्हणून नाही. हा प्रश्न शाश्वत व सम्यक विकासाच्या विचारपद्धतीविरुद्ध आहे.

**१. पश्चिम महाराष्ट्राची खरी ताकद ऊस नव्हे, तर "ऊसाभोवती उभारलेली अर्थव्यवस्था'**-पश्चिम महाराष्ट्राच्या सहकाराचा अभ्यास करताना एक गोष्ट स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे. तेथे विकास केवळ साखर कारखाना उभारण्यामुळे झाला नाही.

ऊ स - सा ख र - मळी-अल्कोहोल/इथेनॉल-बगॅस-वीजनिर्मिती-प्रेसमड-जैवखते-इतर उपपदार्थ

अशा प्रकारे एका कृषी उत्पादनाभोवती अनेक आर्थिक शक्यता शोधण्याचा प्रयत्न झाला. याच कारणामुळे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटसारखी संस्था केवळ साखर उत्पादनाचे प्रशिक्षण देणारी संस्था राहिली नाही.

तिच्या अधिकृत माहितीनुसार ऊस उत्पादन, पीक संरक्षण, पीक सुधारणा, मृदाविज्ञान, ऊसाची रोपे, जैवखते, जैविक नियंत्रण, साखर तंत्रज्ञान, सहउत्पादने, ऊर्जा आणि तांत्रिक सल्ला अशा अनेक क्षेत्रांत संशोधन व विस्तारकार्य केले जाते.

म्हणजेच येथे "पीक' हे अंतिम उत्पादन नव्हते; ते एका मोठ्या औद्योगिक साखळीचे पहिले पाऊल होते. हीच गोष्ट मला महत्त्वाची वाटते.

पश्चिम महाराष्ट्राने ऊसाला फक्त शेतात पाहिले नाही; त्याला प्रयोगशाळेत, कारखान्यात, बाजारात आणि जागतिक अर्थव्यवस्थेत पाहण्याचा प्रयत्न केला.

हीच विकासदृष्टी पूर्व विदर्भात धानाच्या बाबतीत निर्माण झाली असती तर परिस्थिती किती वेगळी असती, याचा विचार करण्याची गरज आहे.

**२. "सहकार' हा केवळ कारखाना उभारण्याचा मार्ग नव्हता.**- पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे यश केवळ कारखान्यांच्या संख्येने मोजता येणार नाही. सहकाराने शेतकऱ्याला उत्पादनाच्या प्रक्रियेत भागीदार करण्याचा प्रयत्न केला. त्यातून वित्तव्यवस्था, प्रक्रिया उद्योग, विपणन, तांत्रिक सेवा, शिक्षण आणि स्थानिक नेतृत्वाची संस्थात्मक रचना विकसित झाली.

तथापि, येथे एक ऐतिहासिक दुरुस्ती आवश्यक आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी साखर क्षेत्राचा विकास पूर्णपणे "सरकारच्या मदतीशिवाय' झाला, असे म्हणणे अचूक ठरणार नाही. सहकारी साखर कारखान्यांना राज्य, केंद्र, सहकारी बँका, NCDC आणि इतर वित्तीय संस्थांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आधार मिळाला आहे. केंद्राच्या अधिकृत माहितीत महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांना NCDCमार्फत मोठ्या प्रमाणावर कर्जसहाय्य झाल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. म्हणून पश्चिम महाराष्ट्राचा धडा असा नसावा की सरकारशिवाय सहकाराने विकास केला.

खरा धडा असा आहे सरकारी धोरण, वित्तीय संस्था, सहकारी संघटना, शेतकरी आणि स्थानिक नेतृत्व यांना एका विशिष्ट कृषी उत्पादनाच्या गरजांभोवती एकत्रित करून संस्थात्मक विकासाची साखळी निर्माण केली. याच ठिकाणी पूर्व विदर्भाची तुलना अधिक अर्थपूर्ण ठरते.

**३. पूर्व विदर्भात धान होते; पण धानाभोवती विकासाची साखळी निर्माण झाली नाही**

गोंदिया-भंडारा परिसरात धान हे केवळ कृषी उत्पादन नाही. या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेचा, श्रमव्यवस्थेचा आणि ग्रामीण जीवनाचा तथा येथील सांस्कृतिक अस्तित्वाचाही तो एक महत्त्वाचा आधार आहे.

गोंदिया जिल्ह्याच्या अधिकृत माहितीत भात हे प्रमुख पीक असून जिल्ह्यात मोठ्या संख्येने तांदूळ गिरण्या असल्याचे नमूद केले आहे. म्हणजेच या प्रदेशात प्राथमिक उत्पादनही होते आणि प्रक्रिया उद्योगाची प्राथमिक पायाभूत सुविधाही होती. पण माझ्या मते, इथेच विकासदृष्टी थांबली.

धान गिरणीत गेले. धानाचे तांदळात रूपांतर झाले. तांदूळ बाजारात गेला.आणि शेतकऱ्याच्या दृष्टीने मूल्यसाखळी जवळजवळ तेथेच संपली. मला नेहमी वाटते आपण सहकारी धान गिरण्या उभारल्या; पण धान अर्थव्यवस्था उभारली नाही. ह्या दोन गोष्टी/बाबी पूर्णपणे वेगळ्या आहेत.

**४. धानापासून किती काही निर्माण होऊ शकते?**

आज जगभरात कृषी क्षेत्राकडे केवळ प्राथमिक उत्पादन म्हणून पाहिले जात नाही. उत्पादन, प्रक्रिया, मूल्यवर्धन, उपपदार्थ, ब्रँडिंग, निर्यात, जैवउद्योग आणि ग्रामीण उद्योग यांना एकत्रित करून मूल्यसाखळी निर्माण केली जाते.

धानाच्या बाबतीत ही शक्यता प्रचंड आहे. धान- तांदूळ पण त्यानंतर- तांदळाचे पीठ- तांदळावर आधारित तयार खाद्यपदार्थ- रेडी-टू-कुक उत्पादने- रेडी-टू-ईट उत्पादने- पारंपरिक तांदूळ पदार्थांचे व्यापारीकरण- तांदळाचे पोषणमूल्यवर्धित पदार्थ- तांदळाचा कोंडा (rice bran)- कोंड्यापासून तेल- तांदळाची टरफले (rice husk)- टरफलापासून ऊर्जा व इतर औद्योगिक उपयोग- तांदळाचा पेंढा- पेंढ्यापासून जैवऊर्जा, बायोचार आणि इतर उत्पादने- तांदळावर आधारित जैवविघटनशील पदार्थ- विशेष वाणांचे ब्रँडिंग- सुगंधी व पौष्टिक तांदळाचे बाजारपेठीकरण अशा असंख्य शक्यता आहेत.

हा केवळ माझा कल्पनाविलास नाही. भारतीय कृषी संशोधन परिषद आणि राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था (ICAR-NRRI) यांनी तांदळाच्या मूल्यवर्धित उत्पादनांवर स्वतंत्र तंत्रज्ञानसंच प्रकाशित केला आहे. त्यात विविध ready-to-cook आणि ready-to-eat तांदूळ उत्पादने विकसित केल्याचे स्पष्ट केले आहे.

ICAR-NRRIच्या अधिकृत कागदपत्रात तांदूळ, तांदळाचे उपपदार्थ, पेंढा, टरफले आणि कोंडा यांचा व्यावसायिक उपयोग करून उत्पन्न वाढविण्याची आवश्यकता स्पष्टपणे मांडली आहे. म्हणजे प्रश्न असा नाही की धानापासून काय करता येते? प्रश्न असा आहे की- हे सर्व पूर्व विदर्भात मोठ्या प्रमाणावर का झाले नाही?

**५. मला "पॅडी रिसर्च इन्स्टिट्यूट'ची गरज का जाणवते?**

पश्चिम महाराष्ट्रात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र संशोधन, प्रशिक्षण आणि विस्तारव्यवस्था उभी राहिली. मग पूर्व विदर्भात अशीच संकल्पना धानासाठी का असू नये?

माझ्या मते, पूर्व विदर्भासाठी एका व्यापक स्वरूपाच्या "Paddy Research and Value Addition Institute' ची संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरू शकते. ही संस्था केवळ धानाच्या नवीन वाणांचा शोध घेणारी नसावी.तिचे काम अधिक व्यापक असावे.

**तिची दिशा अशी असावी**

**पहिला विभाग-** धानशेती संशोधन माती, पाणी, स्थानिक हवामान, रोग, कीड, उत्पादनक्षमता, कमी खर्चाची शेती, यांत्रिकीकरण आणि हवामान बदलाशी जुळणाऱ्या तंत्रज्ञानाचा अभ्यास.

**दुसरा विभाग-** स्थानिक वाणांचे संवर्धन पूर्व विदर्भातील पारंपरिक, सुगंधी, पौष्टिक आणि विशिष्ट गुणधर्म असलेल्या धानवाणांचे दस्तऐवजीकरण, जतन आणि बाजारपेठीय मूल्यांकन.

**तिसरा विभाग-** मिलिंग तंत्रज्ञान धान गिरण्यांची कार्यक्षमता वाढवणे, तुटलेला तांदूळ कमी करणे, ऊर्जा खर्च कमी करणे आणि गुणवत्तापूर्ण तांदूळ निर्मिती.

**चौथा विभाग-** उपपदार्थ संशोधन कोंडा, टरफले, पेंढा आणि इतर अवशेषांचा औद्योगिक वापर.

**पाचवा विभाग-** अन्नप्रक्रिया तांदळापासून आधुनिक तसेच पारंपरिक खाद्यपदार्थ विकसित करणे.

**सहावा विभाग-** बाजारपेठ व ब्रँडिंग "पूर्व विदर्भाचा तांदूळ' हा एक स्वतंत्र कृषी-ब्रँड म्हणून विकसित करता येतो का, याचा अभ्यास.

**सातवा विभाग-** शेतकरी सहकार धान उत्पादक शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, ऋझज, प्रक्रिया केंद्रे आणि सामूहिक विपणन यांची उभारणी.

**आठवा विभाग-**निर्यात स्थानिक तांदळाच्या वैशिष्ट्यांनुसार देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ शोधणे.

**६. "राईस सिटी' असलेल्या गोंदियाने पुढे काय व्हायला हवे?**

मला गोंदियाच्या बाबतीत हा प्रश्न विशेष तीव्रतेने जाणवतो. जिल्हा प्रशासन स्वतः गोंदियाला "Rice City' म्हणून संबोधते. मग केवळ "राईस सिटी' म्हणून ओळख मिळणे पुरेसे आहे का? माझे उत्तर स्पष्ट आहे नाही.

गोंदिया "Rice City'पासून "Rice Knowledge City' होऊ शकतो का?

हा अधिक मोठा प्रश्न आहे. गोंदियात आधीच धान गिरण्यांचा अनुभव आहे. म्हणजे प्रक्रिया उद्योगाची सामाजिक आणि औद्योगिक पायाभरणी शून्यापासून करावी लागणार नाही. त्यावर संशोधन जोडता येईल. संशोधनाला शेतकरी जोडता येईल.

शेतकऱ्याला प्रक्रिया उद्योग जोडता येईल. प्रक्रिया उद्योगाला बाजारपेठ जोडता येईल. बाजारपेठेला ब्रँड जोडता येईल. आणि संपूर्ण साखळीला सहकार जोडता येईल. यातून धानाधारित ग्रामीण औद्योगिकीकरणाचे स्वतंत्र मॉडेल उभे राहू शकते.

**७. मग आपण ऊसाकडे का वळलो?**

याच ठिकाणी माझी टीका अधिक तीव्र होते. पश्चिम महाराष्ट्राने ऊसाभोवती विकासाची साखळी निर्माण केली म्हणून पूर्व विदर्भानेही ऊसाभोवती तशीच साखळी निर्माण करावी, असा निष्कर्ष काढण्यात आला. पण हा निष्कर्ष मूलतः चुकीचा होता.

कारण विकासाचे मॉडेल पिकाच्या नावावर नसते. विकासाचे मॉडेल प्रदेशाच्या भौगोलिक आणि आर्थिक वास्तवावर आधारित असते. पश्चिम महाराष्ट्रातील पाणी, सिंचनाची उपलब्धता, जमीन, हवामान, ऊसाची आर्थिक क्षमता, प्रक्रिया उद्योगाची परंपरा आणि बाजारपेठ यांचा एक विशिष्ट संगम होता.

पूर्व विदर्भात परिस्थिती वेगळी होती.
येथे धान होते.
वनसंपदा होती.
वैनगंगा, वाघ, चुलबंद, पांगोली सारख्या नद्यांचे खोरे होते.
पावसाचे वेगळे स्वरूप होते.
भातशेतीची दीर्घ परंपरा होती.
आदिवासी व ग्रामीण अर्थव्यवस्थेची वेगळी सामाजिक रचना होती.
म्हणून विकासाचे उत्तरही वेगळे असायला हवे होते.

**८. "नकल' आणि "अनुकरण' यामध्ये फरक असतो**

दुसऱ्याच्या अनुभवातून शिकणे चुकीचे नाही. पण दुसऱ्याची संस्था आपल्या परिस्थितीला न जुळवता उचलून आणणे म्हणजे अनुकरण नव्हे; ती विकासदृष्टीची कमतरता आहे. पश्चिम महाराष्ट्राने जर आपल्याला काही शिकवले असेल तर ते "साखर कारखाना कसा काढायचा' हे नव्हे. खरा धडा आहे. "आपल्या प्रदेशातील प्रमुख कृषी उत्पादन ओळखा आणि त्याभोवती संशोधन, प्रक्रिया, वित्त, सहकार, बाजारपेठ आणि मूल्यवर्धनाची संपूर्ण साखळी उभी करा.' हा धडा पूर्व विदर्भाने घेतला असता तर त्याने "ऊस' निवडण्याची गरजच नव्हती. त्याने "धान" निवडले असते.

**९. सहकारी साखर कारखाना हा चुकीचा प्रयोग होता का?**

मी असे सरसकट म्हणणार नाही की विदर्भातील प्रत्येक सहकारी साखर कारखाना चुकीचा होता. इतिहासाचे मूल्यमापन इतक्या साध्या पद्धतीने करता येत नाही. काही ठिकाणी स्थानिक परिस्थिती, पाणी, जमीन, ऊस उपलब्धता, बाजारपेठ आणि व्यवस्थापन यांच्या आधारे साखर उद्योगाला संधी असू शकते. परंतु माझा मूलभूत आक्षेप दुसऱ्या ठिकाणी आहे.

पूर्व विदर्भाच्या प्रमुख कृषी प्रश्नाचे उत्तर ऊसाच्या कारखान्यात शोधण्याऐवजी धानाच्या अर्थव्यवस्थेत शोधले गेले असते तर काय झाले असते?हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

आजही सहकारी साखर क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर वित्तीय व धोरणात्मक आधाराची गरज भासत असल्याचे केंद्र सरकारच्या कागदपत्रांतून दिसते. उदाहरणार्थ, NCDC मार्फत सहकारी साखर कारखान्यांना कार्यभांडवल, इथेनॉल आणि सहवीजनिर्मिती यासाठी कर्जसहाय्य देण्याची केंद्राची स्वतंत्र योजना आहे.

म्हणून कोणत्याही कृषी मॉडेलला "स्वयंपूर्ण' म्हणून गौरविण्यापेक्षा त्यामागील धोरण, वित्त, पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक आधार यांचे वास्तववादी मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

**१०. खरी फसगत कुठे झाली?**

माझ्या दृष्टीने शेतकऱ्यांची फसगत केवळ एखादा कारखाना तोट्यात गेला म्हणून झाली असे नाही. खरी फसगत झाली ती कल्पनाशक्तीच्या अभावामुळे. धान उत्पादक शेतकऱ्याला आपण केवळ धान उत्पादक मानले. त्याला प्रक्रिया उद्योगाचा भागीदार बनविले नाही. त्याला मूल्यवर्धनाचा भागीदार बनविले नाही.

त्याच्या उत्पादनाचा ब्रँड तयार केला नाही. त्याच्या पारंपरिक ज्ञानाचे वैज्ञानिक दस्तऐवजीकरण केले नाही. त्याच्या धानापासून किती प्रकारचे खाद्य, औद्योगिक आणि जैवउत्पादने निर्माण होऊ शकतात याचा व्यापक अभ्यास स्थानिक पातळीवर केला नाही.आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे **धानाला "पीक' म्हणून पाहिले; "उद्योगव्यवस्था' म्हणून पाहिले नाही.**

**११. धान संशोधन संस्था म्हणजे फक्त प्रयोगशाळा नव्हे**

माझ्या कल्पनेतील "Paddy Research Institute' ही केवळ कृषी विद्यापीठाची आणखी एक शाखा नसावी. ती शेतकरी-संशोधक-उद्योग-बाजारपेठ यांच्यातील दुवा असावी.

तिच्याकडे प्रयोगशाळा असावी; पण त्याचबरोबर प्रायोगिक शेत असावे.

तिच्याकडे वैज्ञानिक असावेत; पण शेतकऱ्यांचे पारंपरिक ज्ञान नोंदविणारे संशोधकही असावेत.

तिच्याकडे अन्नतंत्रज्ञान असावे; पण ग्रामीण उद्योजकतेचे प्रशिक्षणही असावे.

तिच्याकडे तांदळाच्या गुणवत्तेचे परीक्षण असावे; पण बाजारपेठीय प्रमाणपत्र आणि ब्रँडिंगची व्यवस्था असावी.

तिच्याकडे संशोधन असावे; पण संशोधन शेतापर्यंत पोहोचविणारी विस्तारव्यवस्थाही असावी.

**१२. "धान ते धन' : पूर्व विदर्भासाठी विकासाचे सूत्र**

माझ्या मते पूर्व विदर्भाच्या विकासाचे एक अत्यंत साधे सूत्र असू शकते.धान ते धन.म्हणजे
धान उत्पादन वाढविणे हा पहिला टप्पा.
धानाची गुणवत्ता वाढविणे हा दुसरा टप्पा.
धानाचे योग्य मिलिंग हा तिसरा टप्पा.
उपपदार्थांचा वापर हा चौथा टप्पा.
अन्नप्रक्रिया हा पाचवा टप्पा.
ब्रँडिंग हा सहावा टप्पा.
देशांतर्गत बाजारपेठ हा सातवा टप्पा.
निर्यात हा आठवा टप्पा.

आणि या सर्व प्रक्रियेत शेतकरी हा केवळ कच्चा माल पुरविणारा नसून मूल्यसाखळीचा भागधारक असावा.

**१३. पूर्व विदर्भाला स्वतःचे विकासमॉडेल निर्माण करावे लागेल**

आज पूर्व विदर्भाने पश्चिम महाराष्ट्राशी स्पर्धा करण्याची गरज नाही. त्याला पश्चिम महाराष्ट्रासारखे होण्याचीही गरज नाही. कारण गोंदिया हा पुणे किंवा सांगली नाही; भंडारा हा कोल्हापूर नाही; वैनगंगा खोरे हे कृष्णा खोरे नाही.

प्रत्येक प्रदेशाची स्वतःची आर्थिक भूगोलशास्त्रे असतात. त्यामुळे पूर्व विदर्भाचा विकासही त्याच्या स्वतःच्या संसाधनांवर आधारित असायला हवा.

धान, जंगल, बांबू, लघुवनोपज, मत्स्यव्यवसाय, पशुधन, ग्रामीण पर्यटन, कृषीप्रक्रिया आणि स्थानिक कौशल्ये यांना एकत्रित करणारे बहुआयामी सहकारी मॉडेल उभे करता येऊ शकते.

पण त्याची सुरुवात एका मूलभूत स्वीकारापासून करावी लागेल आपल्याकडे ऊस नाही म्हणून आपण गरीब नाही; **आपल्याकडे धान आहे म्हणून आपण मागास राहण्याचे कारण नाही.**

**१४. सहकाराचा पुनर्विचार : "कारखाना' नव्हे, "परिसंस्था'**

माझ्या मते भविष्यातील सहकाराची व्याख्या बदलली पाहिजे. सहकारी संस्था म्हणजे केवळ कारखाना नव्हे. सहकारी संस्था म्हणजे- **शेतकरी + संशोधन + प्रक्रिया + वित्त + तंत्रज्ञान + बाजारपेठ + ब्रँड + निर्यात.** ही संपूर्ण परिसंस्था आहे.

धानाच्या बाबतीत अशी परिसंस्था उभारली तर एका शेतकऱ्याच्या एक एकरातील धानाचे आर्थिक मूल्य फक्त बाजारातील कच्च्या धानाच्या भावाने ठरणार नाही.

त्याच्या उत्पादनातून निर्माण होणाऱ्या प्रत्येक उपपदार्थाचा हिस्सा त्या अर्थव्यवस्थेत जोडता येईल.

ICARच्या "secondary agriculture' विषयक भूमिकेतही कृषी उत्पादनातील अवशेष आणि उपपदार्थांचा वापर, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनातून शेतकऱ्यांचे उत्पन्न व रोजगार वाढविण्याच्या संकल्पनेवर भर दिला आहे.हीच संकल्पना पूर्व विदर्भात प्रत्यक्ष उतरविण्याची गरज आहे.

**१५. माझा प्रश्न आजही तसाच आहे**

मी हा प्रश्न कोणत्याही एका राजकीय नेतृत्वाला उद्देशून विचारत नाही. हा प्रश्न संपूर्ण विदर्भाच्या राजकीय, सामाजिक आणि बौद्धिक नेतृत्वाला आहे.

**आपल्या प्रदेशाचे वैशिष्ट्य आपण कधी ओळखणार?**

पश्चिम महाराष्ट्राने ऊस ओळखला. त्याने ऊसाभोवती संस्था उभारल्या. संशोधन उभे केले. सहकार उभा केला. प्रक्रिया उद्योग उभा केला. मूल्यवर्धन केले. बाजारपेठ निर्माण केली.

पूर्व विदर्भाने धान ओळखले पण धानाभोवती तितक्या व्यापक प्रमाणात ज्ञानव्यवस्था, संशोधनव्यवस्था, मूल्यवर्धन व्यवस्था आणि शेतकरी-केंद्रित औद्योगिक व्यवस्था निर्माण करण्यात आपण मागे पडलो. म्हणून आज प्रश्न असा नाही की आपण भूतकाळात काय केले?

**आज प्रश्न असा आहे- आता पुढे काय करणार?**

**१६. "Rice City'पासून "Rice Region'पर्यंत**

गोंदियाला "Rice City' म्हटले जाते. पण माझ्या मनात त्यापेक्षा मोठी कल्पना आहे. गोंदिया केवळ तांदळाच्या गिरण्यांचे शहर राहू नये.
गोंदिया धान संशोधनाचे केंद्र व्हावे.
गोंदिया धान प्रक्रिया तंत्रज्ञानाचे केंद्र व्हावे.
गोंदिया तांदूळ मूल्यवर्धनाचे केंद्र व्हावे.
गोंदिया धानाधारित ग्रामीण उद्योगांचे केंद्र व्हावे.
गोंदिया तांदूळ ब्रँडिंग आणि निर्यातीचे केंद्र व्हावे.
आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गोंदियाच्या शेतकऱ्याला त्याच्या धानाच्या अंतिम मूल्यामध्ये मोठा वाटा मिळावा.

तेव्हाच "Rice City' या नावाला खरा आर्थिक अर्थ प्राप्त होईल.

**१७. शेवटचा विचार : दुसऱ्याचा आरसा नको, स्वतःची दिशा हवी**

माझ्या मते विदर्भाच्या विकासातील सर्वांत मोठी अडचण संसाधनांची कमतरता नाही.

अडचण आहे स्वतःच्या संसाधनांकडे पाहण्याची दृष्टी.

पश्चिम महाराष्ट्राने आपली परिस्थिती ओळखून ऊसाभोवती विकासाची रचना केली. त्या प्रक्रियेत अनेक मर्यादा, राजकीय हस्तक्षेप, आर्थिक अडचणी आणि सरकारी आधार याही होत्या; त्यामुळे त्या मॉडेलचे अंधगौरवीकरण करणे योग्य नाही. पण त्यातून एक मूलभूत धडा नक्की घेता येतो. आपल्या प्रदेशातील प्रमुख उत्पादनाभोवती ज्ञान, उद्योग, सहकार आणि बाजारपेठेची साखळी उभी करणे.

पूर्व विदर्भाने तो धडा घेतला असता तर कदाचित आपण ऊसाचा आरसा उचलला नसता. आपण धानाकडे पाहिले असते.

धानाकडे केवळ शेतकऱ्याच्या शेतातील पीक म्हणून नव्हे, तर

**धान- तांदूळ- उपपदार्थ- अन्नप्रक्रिया-उद्योग-रोजगार- सहकार- ब्रँड- निर्यात-प्रादेशिक समृद्धी** अशा संपूर्ण आर्थिक परिसंस्थेच्या रूपात पाहिले असते.

आजही उशीर झालेला नाही. ICAR-NRRIसारख्या राष्ट्रीय संस्थांनी तांदूळ मूल्यवर्धनाच्या असंख्य शक्यता आधीच दाखवून दिल्या आहेत.

आता गरज आहे ती पूर्व विदर्भासाठी स्वतःचे "धान विकास मॉडेल' तयार करण्याची.

माझ्या मते, पुढील काही दशकांसाठी विदर्भाच्या विकासाचा प्रश्न "पश्चिम महाराष्ट्रासारखे कसे व्हायचे?' असा नसावा.

तो प्रश्न असा असावा

**«"आपल्या वैनगंगा व इतर नद्यांच्या खोऱ्याच्या, आपल्या धानशेतीच्या, आपल्या ग्रामीण समाजाच्या आणि आपल्या नैसर्गिक संसाधनांच्या आधारावर जगाला अनुकरण करण्यास भाग पाडेल असे स्वतःचे विकासमॉडेल आपण कधी उभे करणार**?"»

माझ्या मते, त्या प्रश्नाचे उत्तर "धान' मध्ये आहे; पण त्याहून अधिक ते "धानाभोवती उभी करावयाची ज्ञानव्यवस्था, सहकारव्यवस्था आणि मूल्यसाखळी' मध्ये आहे.

आणि म्हणूनच मला आजही वाटते पूर्व विदर्भाला आणखी एक साखर कारखाना नको; त्याला धानाचे शास्त्र, धानाचे उद्योगशास्त्र आणि धानाच्या मूल्याचे अर्थशास्त्र शिकविणारी स्वतःची संस्था हवी.

हीच खरी विकासाची सुरुवात ठरू शकते.

**(संशोधनात्मक टीप :** या लेखातील "Paddy Research Institute" ही संकल्पना मी विद्यमान एखाद्या संस्थेचे नाव म्हणून मांडलेली नाही; ती पूर्व विदर्भासाठी सुचविलेली स्वतंत्र धोरणात्मक संकल्पना आहे. उलट, भारतात ICAR-NRRIसारखी राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था आधीपासून कार्यरत आहे आणि तिच्या अधिकृत साहित्यामध्ये तांदळाची उत्पादकता, मूल्यवर्धन तसेच तांदळाचे कोंडा, टरफले व पेंढा यांचा व्यावसायिक वापर यावर स्पष्ट भर आहे.)

# "एकात्मिक आरोग्य वर्धिनी"च्या बैठकीत अधिकाऱ्यांची खरडपट्टी



**गोंदिया:-**ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचवण्यात चालढकल करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आता आमदार विनोद अग्रवाल यांनी चांगलाच दणका दिला आहे. पंचायत समिती गोंदिया येथे आयोजित ङ्गएकात्मिक आरोग्य वर्धिनी समितीफच्या तिमाही बैठकीत आमदारांनी आरोग्य यंत्रणेच्या एकूणच सुस्त कारभारावर तीव्र ताशेरे ओढले. "केवळ रजिस्टर भरून कागदोपत्री खानापूर्ती करणे आता खपवून घेतले जाणार नाही, प्रत्यक्ष जमिनीवर काम दिसलेच पाहिजे," अशा कडक शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली.

आमदार विनोद अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र (झकउ) आणि ग्रामीण रुग्णालयांच्या दयनीय अवस्थेचा पाढाच वाचण्यात आला. दौऱ्यादरम्यान नागरिकांनी मांडलेल्या तक्रारींचा हवाला देत आमदारांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

**औषधांचा तुटवडा अनब उकज ची दांडी; आमदारांचा पारा चढला!**

ग्रामीण भागातील सरकारी दवाखान्यांमध्ये रुग्णांना वेळेवर औषधे न मिळणे आणि उपचारासाठी इकडे-तिकडे भटकावे लागणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे सांगत, औषधांची नियमित उपलब्धता सुनिश्चित करण्याचे आदेश देण्यात आले. जर औषधांअभावी रुग्णांची हेळसांड झाली, तर थेट संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून जबाबदारी निश्चित केली जाईल, असा सज्जड इशारा यावेळी देण्यात आला.त्याचप्रमाणे, गावागावांत कार्यरत असणाऱ्या ङ्गकम्युनिटी हेल्थ ऑफिसरफ (उकज) च्या अनुपस्थितीबाबत आमदारांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली. उपकेंद्रे फक्त कागदावर चालणार नाहीत. उकज ने आपल्या क्षेत्रात प्रत्यक्ष उपस्थित राहून सेवा दिलीच पाहिजे. त्यांच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी ग्रामसेवकांमार्फत पत्रे जारी करून घरोघरी जाऊन पाहणी करण्याचे स्पष्ट निर्देश यावेळी देण्यात आले.

बैठकीत जर्जर इमारतींची दुरुस्ती: अत्यंत वाईट स्थितीत असलेल्या उपआरोग्य केंद्रांच्या (डींल उशपींशी) दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्याचे आदेश देण्यात आले.प्रसूतीचे प्रमाण वाढवणे: गर्भवती महिलांना वेळेत उपचार मिळवून देत संस्थात्मक प्रसूतीचे (Institutional Deliveries) उद्दिष्ट वाढवण्यावर भर देण्यात आला.पारदर्शकता आणि माहिती फलक: प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध औषधे, डॉक्टर आणि सुविधांचे रेकॉर्ड फलक नागरिकांना स्पष्ट दिसतील अशा ठिकाणी लावणे बंधनकारक केले आहे.बोगस डॉक्टरांचा ससेमिरा: ग्रामीण भागातील जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या आणि कोणत्याही पदवीशिवाय दुकान मांडून बसलेल्या बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे कठोर निर्देश प्रशासनाला देण्यात आले.

या बैठकीला पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, इऊज्ञ श्री लोंढे, निवासी वैद्यकीय अधिकारी श्री जायसवाल, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. नीलेश जाधव, जिल्हा परिषद सदस्या दीपा चंद्रिकापुरे, वैशाली पंधरे, पूजा अखिलेश सेठ, शैलजा सोनवाने यांच्यासह आरोग्य विभागाचे सर्व वैद्यकीय अधिकारी आणि उकज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार विनोद अग्रवाल यांच्या या आक्रमक भूमिकेनंतर आता आरोग्य विभागातील काम चुकार कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून, ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेत प्रत्यक्ष सुधारणा कधी होणार, याकडे गोंदियाकरांचे लक्ष लागले आहे.

# बनगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थलांतणाला विरोध

## नागरिकांचा विरोध आणि जनआंदोलनाचा इशारा पाहता जिल्हा प्रशासनाला सूचना




**गोंदियाा:-** एकेकाळी उत्कृष्ट रुग्णसेवा आणि विशेषतः महिलांच्या प्रसूती सेवांसाठी जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात नावलौकिक मिळवणाऱ्या आणि ङ्गआनंदीबाई जोशी पुरस्काराफ्ने गौरविण्यात आलेल्या बनगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थलांतराची बातमी वाऱ्यासारखी पसरताच आमगाव परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या केंद्राच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने नागरिक आणि सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. या पार्श्वभूमीवर, ङ्गबनगाव प्राथमिक आरोग्य केंद्र अन्यत्र कुठेही स्थलांतरित होणार नाही, उलट तेथे नवीन व अद्ययावत सुविधांची वाढ केली जाईल,ङ्ग अशी स्पष्ट ग्वाही स्थानिक आमदार संजय पुराम यांनी दिली आहे.

छत्तीसगड आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांच्या सीमेलगत असलेल्या बनगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची ओपीडी दररोज २५० पेक्षा जास्त रुग्णांची आहे. मात्र, गेल्या काही काळापासून इमारतीची दूरवस्था आणि मनुष्यबळाच्या अभावामुळे येथील प्रसूती विभाग बंद पडला आहे.

जीर्ण इमारतीचे नूतनीकरण करण्याऐवजी जिल्हा परिषद प्रशासनाकडून हे आरोग्य केंद्र शहराबाहेर हलवून त्या जागेवर मउद्योग भवनफ उभारण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा रंगली होती.

**नगरपरिषद विखंडनानंतर महत्त्व अधिक**

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने मार्च २०२५ मध्ये काढलेल्या अधिसूचनेनुसार आमगाव नगरपरिषदेचे विखंडन प्रस्तावित आहे. बनगाव, रिसामा, किडंगीपार, पदमपूर, माल्ही, कुंभारटोली व बिरसी या गावांना पूर्ववत ग्रामपंचायतीचा दर्जा मिळणार असल्याने, या ग्रामीण भागासाठी मध्यवर्ती ठिकाणी असलेले बनगाव आरोग्य केंद्र अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. असे असताना केंद्र स्थलांतरित करण्याचा प्रयत्न म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्यासारखे असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी केला.

**लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची भूमिका**

आरोग्य केंद्र वाचवण्यासाठी नागरिकांनी नगरपरिषदेवर मोर्चा काढत तीव्र निदर्शने केली व प्रशासनाला निवेदन दिले.नागरिकांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन आमदार संजय पुराम यांनी गोंदियाच्या जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना (DHO) तातडीने सूचना दिल्या. "हे केंद्र कोणत्याही परिस्थितीत हलवले जाणार नाही. उलट लोकसंख्येचा ताण लक्षात घेता तेथे आवश्यक निधी देऊन अद्ययावत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील," असे त्यांनी स्पष्ट केले.

सामाजिक कार्यकर्ते यशवंत मानकर यांनी यापूर्वीच राज्याच्या आरोग्यमंत्र्यांची भेट घेऊन आरोग्य केंद्राच्या दुरवस्थेची माहिती दिल्यानंतर निधी उपलब्ध करण्याचे आश्वासन मिळाले होते.

प्रशासकीय निर्णयाचा संभ्रम दूर करून बनगाव आरोग्य केंद्राचा आदर्श दर्जा पुन्हा बहाल करण्यासाठी राज्य शासन आता काय पावले उचलते, याकडे संपूर्ण आमगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# २०२७ च्या जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र रकाना द्या




**देवरी:-** भारताची आगामी जनगणना-२०२७ही सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असून, या जनगणनेच्या माहितीपत्रकात इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी स्वतंत्र रकाना समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी देवरी तालुका ओबीसी समाज संघटनेने केली आहे. यासंदर्भातील निवेदन भारताच्या राष्ट्रपती व पंतप्रधान यांना उपविभागीय अधिकारी, उपविभाग (महसूल) देवरी यांच्यामार्फत सादर करण्यात आले.

भारतीय राजपत्र गृह मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार जनगणना-२०२७ संदर्भातील माहितीपत्रकात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी स्वतंत्र नोंदणीची तरतूद आहे. मात्र, ओबीसी प्रवर्गासाठी स्वतंत्र रकाना नसल्याने ओबीसी समाजाची अधिकृत लोकसंख्या व सामाजिक आर्थिक स्थितीचा अचूक आकडेवारीच्या आधारे आढावा घेणे उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी देवरी कठीण होणार असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

ओबीसी समाजाला आरक्षण, शिक्षण, शिष्यवृत्ती, शेतीविषयक लाभ, आर्थिक तरतुदी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधित्व यासह विविध क्षेत्रांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय्य संधी मिळण्यासाठी ओबीसींची अधिकृत जनगणना होणे आवश्यक असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे सन २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणना परिपत्रकात ओबीसी प्रवर्गासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीप्रमाणे स्वतंत्र रकाना देण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच जोपर्यंत जनगणना परिपत्रकात ओबीसी प्रवर्गासाठी स्वतंत्र रकाना देण्यात येत नाही, तोपर्यंत ओबीसी समाज जनगणनेसाठी सहकार्य करणार नाही, अशी भूमिका संघटनेने निवेदनातून स्पष्ट केली आहे. या मागणीची केंद्र शासनाने गांभीर्याने दखल घेऊन जनगणना-२०२७पूर्वी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी अपेक्षा देवरी तालुका ओबीसी समाज संघटनेने व्यक्त केली आहे.

# नागरी हक्क समितीचे ४४ दिवसांचे धरणे आंदोलन यशस्वीतेकडे; गोंदियात आरओबीच्या निर्मितीला वेग

## माजी केंद्रीय मंत्री प्रफुल पटेल यांचे आश्वासन; आंदोलकांचा दावा, काम पूर्ण होईपर्यंत लढा राहणार सुरू



**गोंदिया:-** शहरातील सिग्नल टोली, कुंभारे नगर आणि लक्ष्मीनगर या तीन महत्त्वाच्या प्रभागांतील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी नागरी हक्क व सुरक्षा समितीच्या नेतृत्वात सुरू असलेले बेमुदत धरणे आंदोलन अखेर यशोशिखराकडे वाटचाल करत आहे. गेल्या ४४ दिवसांपासून सलग सुरू असलेल्या या आंदोलनाची दखल घेत रेल्वे ओव्हर ब्रिजच्या (आरओबी) निर्मितीची प्रक्रिया रेल्वे प्रशासनाकडून वेगाने सुरू करण्यात आल्याची सकारात्मक माहिती समोर आली आहे.

या परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी सोयीस्कर आरओबी उभारावा, अशी आग्रही मागणी घेऊन स्थानिक शिष्टमंडळाने राज्यसभा खासदार व माजी केंद्रीय मंत्री प्रफुल पटेल यांची भेट घेतली. राज्यसभा खासदार राजेंद्र जैन यांच्या उपस्थितीत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रफुल पटेल यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. याप्रसंगी झालेल्या सकारात्मक चर्चेदरम्यान, "सदर आरओबीच्या बांधकामाची प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया अत्यंत वेगाने सुरू असून या लोकहिताच्या मागणीकडे स्वतः जातीने लक्ष देत रेल्वे प्रशासनाशी सातत्याने संपर्क साधत आहे," असे आश्वासन प्रफुल पटेल यांनी दिले. लोकप्रतिनिधींच्या या पुढाकारामुळे गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न निकाली निघण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

आंदोलनाचा निर्धार: सलग ४४ दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला स्थानिक जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. जोपर्यंत प्रत्यक्ष पुलाच्या बांधकामास सुरुवात होऊन काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा ठाम निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

आंदोलनाचे नेतृत्व: सुरेश रंगारी व राजेश बंसोड यांच्या संचालनाखाली एच.जी. रंगारी, दीपक बनसोड, नामदेव मेश्राम, जी.एस. लोनारे, डी.एस. मेश्राम , दिनेश गेडाम, किशोर मेश्राम, रूपदास मेश्राम, विजयकुमार कांबळे, वामन मेश्राम, दिलीप वासनिक, जितेंद्र सतीसेवक, सुरेंद्र महाजन, संजय मेश्राम, विनोद वासनिक, विजय रंगारी, राजकुमार हुमने, किशोर गजभिये, आनंद शहारे, ए.बी. मेश्राम, अनिल रंगारी, सुनील चव्हाण, तसेच समितीचे अध्यक्ष अमितकुमार मेश्राम, सतीश बनसोड व जयंत कुंभलवार यांसारखे शेकडो नागरिक या लढ्यात सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.

लोकप्रतिनिधींनी दिलेले आश्वासन आणि रेल्वे प्रशासनाकडून सुरू झालेल्या हालचालींमुळे गोंदियातील तीनही प्रभागांतील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, प्रत्यक्ष पुलाचे काम कधी सुरू होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### बेरोजगार व्यक्तींकरिता "सीसीटीव्ही कॅमेरा इंस्टॉलेशन व रीपेरिंग" व्यवसायाचे मोफत प्रशिक्षण

**गोंदिया:-** बँक ऑफ इंडिया ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था कुडवा (गोंदिया) द्वारे जिल्ह्यातील बेरोजगार युवक व युवतींना स्वयंरोजगार करण्यासाठी प्रोत्साहित करण्याकरिता विविध प्रकारचे स्वयंरोजगार प्रशिक्षण आयोजित केले जातात. ही संस्था भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे संचालित केले जाते. स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेने आजपर्यन्त १०,७१३ ग्रामीण व्यक्तींना प्रशिक्षण दिले असून त्यापैकी ७,८७५ व्यक्तींनी मिळिवलेल्या प्रशिक्षणाच्या आधारे स्वयंरोजगार सुरू केला आहे.

बँक ऑफ इंडिया (आरसेटी) स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेद्वारे बेरोजगार १८ ते ५० वयोगटातील व्यक्तींकरीता ङ्गसीसीटीव्ही कॅमेरा इंस्टॉलेशन व रीपेरिंगङ्ग या व्यवसायाचे १३ दिवसीय मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. परंतु आरसेटीला कोर्स सुरू करण्याकरिता कमीत कमी ३० ते ३५ उमेदवारांची गरज असते. तसेच या संस्थेमध्ये विविध प्रकारचे कोर्स नि:शुल्क असून राहण्याची, जेवणाची नि:शुल्क सोय प्रशिक्षण संस्थेतच करण्यात येत आहे. त्याकरिता गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखाली कुटुंबातील इच्छुक लोकांनी जास्तीत जास्त संख्येने व लवकरात लवकर संस्थेत येऊन आपले नाव नोंद करावेत.

# अदानी फाउंडेशनचा संवेदनशील उपक्रम: १४०० हून अधिक महिलांची नेत्रतपासणी



**गोंदिया:-**कुटुंबाची अहोरात्र काळजी घेताना स्वतःच्या आरोग्याकडे आणि विशेषतः दृष्टीकडे दुर्लक्ष करणाऱ्या ग्रामीण भागातील महिलांसाठी अदानी फाउंडेशनने आशेचा किरण दाखवला आहे. अदानी पॉवर लि. तिरोडाचे स्टेशन हेड मयंक दोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अदानी फाउंडेशनचे प्रमुख बिमूल पटेल यांच्या नेतृत्वात परिसरातील १० गावांमध्ये महिलांसाठी विशेष मोफत नेत्रतपासणी व चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यात १०४२ महिलांना मोफत चष्मे वितरीत करण्यात आले.

**१० गावांमध्ये राबवला उपक्रम**

हे विशेष शिबीर चिरेखनी, काचेवानी, गराडा, खैरबोडी, बेरडीपार, चिखली, गुमाधावाडा, कवलेवाडा, चुरडी आणि मेंदिपूर या १० ग्रामपंचायतींच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. ग्रामीण भागातील महिलांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात आणि वेळेवर निदानाअभावी दृष्टी न गमावली जावी, या सामाजिक उद्देशाने ही मोहीम राबवण्यात आली.

वर्षानुवर्षे धूसर दिसण्याच्या समस्येने त्रस्त असलेल्या, मात्र आर्थिक अडचणींमुळे चष्मा घेऊ न शकणाऱ्या महिलांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. चष्मा मिळाल्यानंतर महिलांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दृष्टीचा आनंद आणि समाधान पाहायला मिळाले.ग्रामीण भागातील माता-भगिनींचे आरोग्य उत्तम राहावे आणि त्यांचा जीवनमान दर्जा सुधारावा, यासाठी अदानी फाउंडेशन सदैव कटिबद्ध असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# बाभळीचा ऱ्हास: पर्यावरणाची किंमत मोजणार तरी कोण?

## बाभळीच्या अमर्याद तोडीमुळे माती, पाणी आणि जैवविविधतेवर गंभीर परिणाम होण्याची भीती



**देवरी:-** महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शेताच्या बांधावर, रस्त्याच्या कडेला आणि पडीक जमिनीवर दिसणारे बाभळीचे झाड अनेकांना निरुपयोगी वाटते. मात्र, पर्यावरणाच्या दृष्टीने ते ग्रामीण परिसंस्थेचा कणा आहे. बाभळीच्या लाकडाच्या वाहतुकीला शासनाने परवानगी दिली आहे. आज त्या सवलतीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत असल्याचे समोर येत आहे. परिणामी, बाभळीच्या वृक्षांच्या होणाऱ्या ऱ्हासामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. या होणाऱ्या पर्यावरण नुकसानीची भरपाई शेवटी करणार कोण? असा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे

केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिकृत दस्तऐवजानुसार, महाराष्ट्रात बाभूळ प्रजातीसाठी २१ जून १९९० रोजीच्या अधिसूचनेद्वारे फॉरेस्ट ट्रान्झिट पास मधून सूट देण्यात आली आहे. या सवलतीमागे शेतकरी आणि लाकूड व्यावसायिकांना अनावश्यक प्रशासकीय अडथळ्यांपासून मुक्त करणे, हा हेतू होता. मात्र, या सवलतीचा आधार घेत राज्यात बाभळीची अमर्याद आणि बेसुमार तोड सुरू झाल्याने पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची भीती व्यक्त होत आहे. वाहतुकीची सूट म्हणजे तोडीची परवानगी नव्हे, इथेच सर्वात मोठा गैरसमज होत आहे. ट्रान्झिट पास मधून सूट मिळणे म्हणजे वृक्षतोड करण्याची अमर्याद परवानगी मिळणे, असे नाही. महाराष्ट्रात शहरी क्षेत्रात महाराष्ट्र नागरी क्षेत्रें झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ लागू आहे. या कायद्यानुसार, वनाधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय कोणतेही झाड तोडता येत नाही. ग्रामीण भागातही महसूल आणि वन विभागाच्या नियमानुसार तोडीचे नियमन आहे. म्हणजेच, ङ्गबाभळीला सूट आहे म्हणून कुठेही आणि कितीही बाभळी तोडता येतेङ्ग हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. एक झाड तोडले तर काय घडते? पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, बाभळीच्या बेसुमार तोडीचे परिणाम तात्काळ दिसत नाहीत. पण ते दूरगामी आणि गंभीर असतात.

**शासनासमोर दुहेरी आव्हान**

एकीकडे शेतकऱ्याला त्याच्या जमिनीवरील उत्पादनाचा आर्थिक लाभ मिळवून देणे आणि दुसरीकडे राज्याची हिरवळ टिकवणे. आज बाभळीला लाकूड म्हणून किंमत मिळते, पण उद्या त्याची अनुपस्थिती माती, पाणी आणि हवेच्या संकटाच्या रूपात आपल्यासमोर उभी राहू शकते. त्यामुळे १९९० च्या सवलतीचा आजच्या पर्यावरणीय वास्तवाच्या पार्श्वभूमीवर वैज्ञानिक फेर-अभ्यास होणे ही काळाची गरज बनली आहे. बाभूळ हे केवळ काटेरी झाड नाही, ते ग्रामीण महाराष्ट्राच्या पर्यावरणाचा आधार आहे, हे दुर्लक्षित करून चालणार नाही. अन्यथा त्याचे गंभीर परिणाम आपल्या पुढील पिढीला भोगावे लागतील, हे नक्की.

झाड तोडा, एक झाड लावा - हे पुरेसे आहे का? याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. आज १५ ते २० वर्षांचे मोठे बाभळीचे झाड तोडून त्याजागी एक छोटे रोप लावले तर कागदावर संख्या भरून निघते, पण पर्यावरणीय हिशोबात बसत नाही. मोठ्या झाडाने वर्षानुवर्षे साठवलेला कार्बन, दिलेली सावली आणि निर्माण केलेली परिसंस्था एका रोपाने भरून निघत नाही. बाभळीवरील सूट पूर्णपणे रद्द करणे हा एकमेव उपाय नाही. तर सवलतीसोबत संरक्षणाचा समतोल साधणे गरजेचे आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये 'पे बॅक टू सोसायटी'चा भाव रुजवणारा बहुजन संस्थेचा उपक्रम; ३७ गुणवत्ताधारकांचा गोरेगावमध्ये गौरव

## संविधान मूल्ये अनब सामाजिक जबाबदारीवर वक्त्यांचा भर; बीडीओ सारीपुत्र धोटे यांची प्रमुख उपस्थिती



**गोरेगाव:-**शिक्षण हे केवळ गुण मिळवण्याचे माध्यम नसून संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडवण्याची ती खरी कसौटी आहे, असा महत्त्वाचा संदेश देत गोरेगाव येथील बहुजन सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित मेधावी विद्यार्थी सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. चंद्रपूर टोली येथील बुद्ध विहारात पार पडलेल्या या कार्यक्रमात तालुक्यातील ३७ गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना शैक्षणिक यशासोबतच ङ्गपे बॅक टू सोसायटीफ (समाजाचे देणे घेणे) या प्रेरणादायी विचारांची शिदोरी देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गट विकास अधिकारी (इऊज्ञ) सारीपुत्र धोटे होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून श्रेया धोटे उपस्थित होत्या. मंचावर संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पंचभाई, उपाध्यक्ष आर. डी. कटरे आणि कोषाध्यक्ष रघुपती अगळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाच्या सामूहिक वाचनाने झाली. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही संविधान मूल्ये विद्यार्थ्यांनी आयुष्यात अंगीकारावीत, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

शिक्षण व्यवस्थेवर चिंता: वाढत्या अंक-स्पर्धेत आणि शिक्षणाच्या व्यापारीकरणात मानवी मूल्यांचा ऱ्हास होऊ नये, यावर वक्त्यांनी चिंता व्यक्त केली.

विशेष यश संपादन करणारे विद्यार्थी: MS-CIT परीक्षेत शंभर टक्के गुण मिळवून राज्यात प्रथम आलेली हिमानी दिनेश मंडळवार आणि शिष्यवृत्ती परीक्षेत (इयत्ता ४ थी) जिल्ह्यात दुसरी आलेली रुही महेंद्र काटरे हिचा विशेष सत्कार करण्यात आला.

गुणवत्ता यादी: सीबीएसई १० वी मधील जान्हवी पटले (९६.४०%), दीक्षा सूर्यवंशी (९६.२०%), निखिल गनवीर (९६%) तसेच राज्य मंडळ १० वी मधील जान्हवी चौधरी (९७%), समृद्धी बिसेन (९१.४०%) व अक्षय बिसेन (९१%) या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

सत्कारमूर्ती सर्व ३७ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी आणि "शिवाजी कोण होते' हे पुस्तक भेट देऊन गौरविण्यात आले.संस्थेच्या मशिक्षण, सेवा, समता व विकासफ या ध्येयानुसार आरोग्य, पर्यावरण आणि कौशल्य विकासाचे कार्य अधिक व्यापक करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी पटले व एच. एस. शहारे यांनी केले, तर पुरुषोत्तम साकुरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. "आज तुमचा सन्मान झाला आहे, उद्या तुमच्या कर्तृत्वाने समाजाचा सन्मान वाढला पाहिजे," या संदेशाने सोहळ्याची सांगता झाली.

### वाल्मीक मत्स्य बीज व मत्स्य खाद्य निर्मिती प्रकल्पामुळे मत्स्यपालनाला नवी दिशा; गोंदियात खरेदी-विक्री संमेलन उत्साहात

**गोंदिया :-** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत जिल्हा अभियान कक्ष, गोंदिया यांच्या वतीने जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या मवाल्मीक मत्स्य बीज व मत्स्य खाद्य निर्मिती प्रकल्पफ (राजीवनगर, ताळगाव, ता. अर्जुनी मोरगाव) संदर्भात विशेष खरेदी-विक्री संमेलन व मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले.

प्रकल्प संचालक तथा जिल्हा अभियान सहसंचालक प्रमिला जाखलेकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.संमेलनाला जिल्ह्यातील मोठ्या संख्येने मत्स्यपालक, मत्स्य व्यवसायिक तसेच मत्स्य बीज व मत्स्य खाद्य विक्रेते उपस्थित होते.

# गुदमा-प्रतापबाग नवीन रेल्वे मार्गाला शेतकऱ्यांचा विरोध ;अन्यथा ३१ ऑगस्ट रोजी रास्ता रोको आंदोलन



**गोंदिया :-** तालुक्यातून जाणाऱ्या गुदमा- प्रतापबाग या नवीन रेल्वेमार्गासाठी कटंगी कला, नागरा, हलबीटोला व सावरी येथील शेतकऱ्यांची जमीन संपादित केली जात आहे. मात्र भूसंपादन प्रक्रियेच्या मोबदल्यात दिली जाणारी रक्कम फारच कमी असल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष व्याप्त आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या नवीन रेल्वे मार्गाला विरोध केला आहे. रेल्वे विभागाने ३० ऑगस्टपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण न केल्यास ३१ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता कटंगी नाका बालाघाट रोड येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. शेतकऱ्यांनी सरकारला वेळीच हस्तक्षेप करण्याची व योग्य निर्णय घेण्याची विनंती केली आहे याच विषयावर २३ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत, कटंगी कला येथील सभागृहात शेतकऱ्यांची सभा घेण्यात आली.

शेकडो शेतकरी सभेला उपस्थित विभागाकडून रेल्वे मार्गासाठी जमिनी होते. यावेळी शेतकऱ्यांनी रेल्वे संपादित करताना योग्य मोबदला न देता तुटपूंजी रक्कम देऊन शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप केला. तसेच सभेत जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या जोपर्यंत मार्गी लावल्या जात नाहीत तोपर्यंत रेल्वे मार्गासाठी भूसंपादन करू दिले जाणार नाही असा निर्णय शेतकऱ्यांनी एकमुखाने घेतला.

ज्या शेतकऱ्यांची जमीन, घर किंवा दुकान संपादित केली जाईल त्यांच्या कुटुंबातील एक सदस्याला सरकारी नोकरी द्यावी. संपादित मालमत्तेस पाचपट मोबदला देण्यात यावा. तर काही शेतकऱ्यांच्या जमिनी संपादनानंतर शेतीयोग्य राहणार नाही, तर उर्वरित जमिनीला योग्य मोबदला देण्यात यावा. रेल्वेमार्गामुळे मार्ग बंद झाल्यास शेतकऱ्यांसाठी पर्यायी रस्ते निर्माण करावेत अशी मागणी शेतकऱ्यांनी सभेत केली.

यावेळी अखिलेश सेठ, नंदूभाऊ बिसेन, कार्तिक चौहान, सूरज बावनकर, ईश्वर उपवंशी, माणिकचंद भगत, सुरेश तिवडे, कृष्णा बांते, रुपेश लिल्हारे, इमलाबाई लिल्हारे, हेमंत कुमार हनवते, राजू चन्नेकर, रविंद्र कुमार चिकलोंढे व शेतकरी उपस्थित होते.

# झाडीबोलींचा शब्दकोश तयार करणार-मराठी भाषा मंत्री उदय सामंत

## विदर्भातील पहिल्या पुस्तकांचे गाव नवेगाव बांध येथे थाटात लोकार्पण



**गोंदिया:-** मराठी भाषेचा विकास, तिचा अभिजात दर्जा अधिक बळकट करणे आणि जागतिक स्तरावर मराठीला प्रमुख भाषा म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी गावपातळीवर वाचन संस्कृती रुजविणे आवश्यक आहे. त्यासाठीच ङ्गपुस्तकांचे गावफ ही संकल्पना राबविण्यात आली असून, विदर्भातील पहिले पुस्तकांचे गाव नवेगाव बांध येथे सुरू होत असल्याचा आनंद आहे, असे प्रतिपादन राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले. तसेच झाडीबोली साहित्यामधील अनेक शब्दांचा मराठी अर्थ नागरिकांना कळत नसल्याने त्या शब्दांचा मराठी अर्थ जनसामान्यांना कळावा याकरीता शब्दकोष निर्मितीचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणाही त्यांनी करीत जिल्ह्यातील साहित्याकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशन मराठी राज्यभाषा विभाग करणार असल्याचे सांगितले.

यावेळी आमदार इंजि.राजकुमार बडोले, जिल्हाधिकारी मंदार पत्की,नवेगावबांधच्या सरपंच सौ.हिराताई पंधरे,राज्य मराठी भाषा विकास संस्थेचे संचालक श्यामकांत देवरे, रामदास बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्री. सामंत म्हणाले की, गोंदिया जिल्ह्याला समृद्ध वनसंपदा, साहित्य आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ मारुती चितमपल्ली यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली आहे. येथील वाचन संस्कृती अधिक मजबूत करण्यासाठी राज्य शासनाने नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या नवेगाव बांधची "पुस्तकांचे गाव' म्हणून निवड केली आहे. या पुस्तकांचे गावाला मारुती चितमपल्ली यांचे नाव देण्याचा निर्णय घेतांना आज पहिल्या दालनाचे उद्घाटन करताना विशेष आनंद होत असल्याचे ना.सावंत म्हणाले.

झाडीबोली साहित्य संमेलनासाठी शासनाकडून दरवर्षी २५ लाख रुपयांचे अनुदान दिले जाईल, अशी घोषणा करत त्यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यासाठी तिची समृद्ध ग्रंथसंपदा, संतपरंपरा आणि ऐतिहासिक वारसा महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या साहित्यामुळे मराठी अधिक समृद्ध झाली आहे. मराठीचा पहिला राज्यव्यवहार कोश छत्रपती शिवाजी महाराजांनी तयार केला होता, याचीही त्यांनी आठवण करून दिली.

मराठीसोबतच विविध बोलीभाषांचाही विकास झाला पाहिजे आणि "पुस्तकांचे गाव' ही संकल्पना त्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. महाराष्ट्राच्या सीमेवरील "चांदा ते बांदा' या संकल्पनेनुसार प्रत्येक भागात पुस्तकांचे गाव आणि कवितेचे गाव उभारण्याचा शासनाचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.



मराठीत शिक्षण घेऊनही जागतिक स्तरावर यश संपादन करता येते, याचा उल्लेख करत त्यांनी मातृभाषेच्या सामर्थ्यावर भर दिला. महाराष्ट्रात उद्योग उभारण्यासाठी येणाऱ्या परप्रांतीयांनी मराठी भाषा शिकल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल, असेही ते म्हणाले. राज्य शासनाने आतापर्यंत १ लाख ६७ हजार हिंदी भाषिकांना मराठी शिकवल्याची माहिती त्यांनी दिली. विद्यार्थ्यांनी मातृभाषेत शिक्षण घेऊन आपल्या मातीत राहून समाजसेवा करावी आणि जागतिक स्तरावरही नाव कमवावे, असा मोलाचा संदेश ही त्यांनी यावेळी दिला.

भंडारा दौऱ्यात गणेशपूर हे "पुस्तकांचे गाव' आणि लाखनी हे "कवितेचे गाव' तसेच गोंदिया शहराला सुध्दा "कवितेचे गाव' म्हणून घोषित करण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. तसेच, झाडीपट्टीतील साहित्याचा अभ्यास करण्यासाठी आपणही त्यात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. शरद मेश्राम यांनी केले, तर सूत्रसंचालन सहायक प्राध्यापक डॉ. लक्ष्मीकांत कापगते यांनी केले.

# गोंदिया–मुंबई प्रवासी विमानसेवा दिवाळीनंतर;प्रफुल्ल पटेल यांची ग्वाही

**गोंदिया :-** शहराच्या विस्तारीकरणाला आतील भागात वाव नसून शहरालगत विस्तारीकरण करणे शक्य आहे. त्यासाठी शहरालगतच्या रस्त्यांचा विकास करणे गरजेचे आहे. गोंदिया–बालाघाट, गोंदिया–आमगाव, गोंदिया–कोहमारा या मार्गावर बायपास मार्गाची निर्मिती करण्यावर भर दिला जाणार आहे. याच संदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत काही दिवसांपूर्वीच बैठक पार पडली. यात सकारात्मक यावर चर्चा झाली आहे. शहराच्या विस्तारीकरणासाठी रस्त्यांचा विकास करणे गरजेचे असून त्या दृष्टीने आता प्रयत्न सुरू असल्याचे खा. प्रफुल्ल पटेल यांनी शुक्रवारी (दि. २१) येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.



बिरसी विमानतळावरुन सुरु असलेली प्रवाशी विमानसेवा ही इंडिगो आणि स्टार एअर कंपनीने बंद केली आहे. या विमानतळा–वरुन पुन्हा प्रवासी विमानसेवा सुरु करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. गोंदिया–मुंबई या मार्गावरील प्रवासी विमानसेवेला चांगला प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा असून त्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. दिवाळीनंतर ही सेवा सुरु होण्याची शक्यता खा. प्रफुल्ल पटेल यांनी वर्तविली.

खा. प्रफुल्ल पटेल यांच्या रामनगर येथील निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेला खा. राजेंद्र जैन उपस्थित होते. खा. प्रफुल्ल पटेल म्हणाले, गोंदिया–बालाघाट मार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाचे काम सुध्दा चुकीच्या डिझाईनमुळे रखडले होते. आधीच या मार्गावर सदोष उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदोष उड्डाणपुलाची दुरुस्ती केली जाईल. तसेच शहरातील रस्ते व उड्डाणपुलाचे रखडलेले काम सुध्दा लवकरच पूर्ण केले जाईल असे सांगितले. मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाचा गोंदियापर्यंत विस्तारीकरणाचे काम जोमाने सुरु आहे. समृद्धी महामार्गाला जोडून गोंदिया–गोंदिया–आमगाव हा बायपास मार्ग तयार करण्याचे विचाराधीन असून यामुळे जड वाहतूक शहराबाहेरुन वळिवण्यास मदत व वाहतूक कोंडीपासून शहरवासीयांना मुक्तता आणि शहराच्या विस्तारीकरणास मदत होणार असल्याचे सांगितले.

### हिरडामालीत होणार मालधक्का

शहरातील रेलटोली परिसरातील मालधक्क्यामुळे अनेकदा या परिसरात वाह–तूक कोंडी होत असून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना यांचा फटका बसत आहे. शिवाय अपघाताची शक्यता सुध्दा बळा–वली आहे. यासर्व गोष्टी लक्षात घेता आता रेलटोली परिसरातील मालधक्का हिरडामाली परिसरात हटविण्यात येणार असल्याचे खा. प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले.

### सिंगलटोली परिसरात आरओबी तयार करणार

शहरातील प्रलंबित उड्डाणपुलाच्या कामाला येणार गती, अडचण दूर होणार शहरातील सिंगलटोली भिमनगर परिसरात रेल्वे विभागाकडून भूमिगत पुलाचे बांधकाम केले जात आहे. याला नागरिकांचा विरोध असून यावर तोडगा काढण्यासाठी या ठिकाणी आरओबी तयार करण्यात यावा या संदर्भात रेल्वे विभागाशी चर्चा झाली आहे. त्यांनी सुध्दा सकारात्मक प्रतिसाद दिला. सिंगलटोली परिसरात नागरिकांची अडचण लक्षात घेऊन निश्चित आरओबी तयार करण्यात येणार असल्याचे खा. प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले

# लोकशाही दिनाचे आयोजन ७ सप्टेंबरला

**गोंदिया:-** जिल्ह्यात सर्वसामान्य जनतेसाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. सप्टेंबर महिन्यात पहिल्या सोमवारी दि.७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी मंदार पत्की यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

लोकशाही दिनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांचेकडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागाचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्या संबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील. जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिनानिमित्त या कार्यक्रमात ज्या नागरिकांनी १५ दिवसापूर्वी अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनीच लोकशाही दिनात उपस्थित रहावे.

# रानभाज्यांच्या माध्यमातून पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे जतन व रोजगार निर्मितीला चालना -आमदार राजकुमार बडोले



**सडक अर्जुनी :-** तालुका कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने तहसील कार्यालय परिसर, सडक अर्जुनी येथे तालुकास्तरीय रानभाजी प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवास आमदार राजकुमार बडोले यांनी उपस्थित राहून रानभाज्यांचे महत्त्व, त्यांचे संवर्धन आणि त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

गोंदिया जिल्हा मोठ्या प्रमाणात वनक्षेत्राने व्यापलेला असून या परिसरात विविध प्रकारच्या पौष्टिक व औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा महत्त्वाचा भाग असलेल्या या रानभाज्यांचे जतन, संवर्धन आणि त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे आमदार बडोले यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार राजकुमार बडोले म्हणाले की, "रानभाज्या या आपल्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे या पारंपरिक खाद्यपदार्थांकडे दुर्लक्ष होत असले, तरी रानभाज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पोषक घटक, जीवनसत्त्वे व खनिजे उपलब्ध असतात. त्यामुळे निरोगी व सकस आहाराच्या दृष्टीने रानभाज्यांचे महत्त्व अधोरेखित करण्याची गरज आहे."

रानभाज्यांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास महिला बचत गट, शेतकरी आणि वन परिसरातील नागरिकांना उत्पन्नाचे नवीन साधन उपलब्ध होऊ शकते. रानभाज्यांच्या माध्यमातून स्थानिक रोजगार निर्मिती, महिला बचत गटांचे आर्थिक सक्षमीकरण तसेच शेती व पर्यटनाला चालना देण्याची मोठी क्षमता आहे, असेही आमदार बडोले यांनी सांगितले.

रानभाजी महोत्सवाच्या माध्यमातून विविध प्रकारच्या रानभाज्यांची ओळख, त्यांचे पोषणमूल्य, आरोग्यदायी महत्त्व आणि पारंपरिक खाद्यपद्धती याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होत असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करून रानभाज्यांना व्यापक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास पंचायत समिती सभापती चेतनजी वडगाये, तहसीलदार इंद्रायणी गोमासे, पंचायत समिती उपसभापती निशाताई काशिवार, सदस्य शालिंदरजी कापगते, वर्षाताई शहारे, शिवाजीजी गहाणे, अल्लूद्दीनजी राजानी, दीपालीताई मेश्राम, तालुका कृषी अधिकारी रवींद्रजी लांजेवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रल्हादजी कोरे, शेतकरी सल्लागार समितीचे अध्यक्ष हरिदासजी कापगते, तालुका व्यवस्थापक उमेद अतुलजी मुरकुटे, तालुका व्यवस्थापक पालिद्राताई अंबादे यांच्यासह महिला बचत गटांच्या महिला, शेतकरी बांधव व कृषी विभागाचे अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते. या महोत्सवात विविध प्रकारच्या रानभाज्यांचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली. महिला बचत गटांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पारंपरिक रानभाज्यांची माहिती व त्यांचे खाद्यपदार्थ नागरिकांसमोर सादर केले.

# पाणी व माती संवर्धनासाठी गोंदियाकरांची एकजूट ; नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**गोंदिया:-** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.सुधाकररावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन साजरा करण्यात आला. पाणी आणि माती संवर्धनाची चळवळ केवळ सरकारी उपक्रम न राहता ती जनमानसाची चळवळ व्हावी, या उद्देशाने गोंदिया येथे "महा वॉकेथॉन – वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले.सकाळच्या प्रसन्न वातावरणात नागरिक, विद्यार्थी, अधिकारी–कर्मचारी, खेळाडू तसेच विविध संस्था–संघटनांचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने जलसंधारणाच्या संदेशाला लोकसहभागाची जोड मिळाली.

गोंदिया येथे शुक्रवार,२१ ऑगस्ट रोजी जयस्तंभ चोक येथून वॉकॅथॉनला उत्साहात सुरुवात झाली. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर,माजी जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी जेनिथ चंद्रा दोंन्तूला, अति. जिल्हाधिकारी अभिजीत घोरपडे, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.तानाजी लोखंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी फरेंद्र कुतिरकर, विजय लोंढे, कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखडे, जिल्हा जलसंधारण अधिकारी सत्यजीत राऊत, सहा.जिल्हा जलसंधारण अधिकारी आदित्य राऊळवार, श्रीमती स्वाती तुरकर, जिल्हा परिषद सिंचन उपविभागाचे उप विभागीय अभियंता विजय माळी, विशाल पिंपळे, सुमित नागदेवे, कु.शुभदा अष्ठूळ, मृद व जलसंधारण विभागाचे उपविभागीय अभियंता मडावी, वसंत राऊत श्रीमती सोनाली ढोके,यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी मुख्यमंत्री स्व.सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सहभागी नागरिकांना मृदा व जलसंधारणाची शपथ देण्यात आली. गोंदिया जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी जेनित चंद्रा दोंन्तूला यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून वॉकॅथॉनला सुरुवात करण्यात आली.



जयस्तंभ चौकातून सुरु झालेली वाकथॉन शिवधाम,फुलचूर येथे पोहोचली. या मार्गावर जलसंधारण,पाणी बचत आणि माती संवर्धनाचा संदेश देत सहभागी नागरिकांनी उत्साहाने वॉकॅथॉन पूर्ण केली. शिवधाम येथे जलपुजन करण्यात आले वॉकथॉन मध्ये सहभागी असलेल्या नागरिकांसह शाळा–महाविद्यालयीन विद्यार्थी, विविध शासकीय विभागांचे अधिकारी–कर्मचारी, संस्था व संघटनांचे पदाधिकारी यांना प्रशस्तीपत्र वाटप करण्यात आले सर्व उपस्थितांकरीता चहा–नास्ता ची व्यवस्था करण्यात आली.

### "पाणी अडवा, पाणी जिरवा'चा संदेश

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर म्हणाले की,पाण्याचे संवर्धन,भूजलपातळी वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी "पाणी अडवा,पाणी जिरवा' हा मूलमंत्र आहे.या माध्यमातून जलसंधारणाची कामे लोकसहभागातून व्यापक स्वरूपात राबविणे आवश्यक आहे.पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविणे तसेच जलस्रोतांचे पुनरुज्जीवन केल्याने भूजलपातळी वाढण्यास आणि शेतीसाठी पाण्याची उप–लब्धता टिकवून ठेवण्यास मदत होते.पाण्याचा वापर प्रत्येकाने गरजेनुसार आणि काटकसरीने करणे ही काळाची गरज आहे.२६ जानेवारीपर्यंत सुरू राहणाऱ्या पाणी संवर्धनाच्या विविध उपक्रमांमध्ये नागरिकांनी अधिकाधिक सहभागी व्हावे,असे आवाहनही यांनी केले.

प्रास्ताविकात जिल्हा जलसंधारण अधिकारी इंजी.सत्यजीत राऊत यांनी जलसंधारण अभियानांतर्गत विविध स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती दिली.ग्रामीण भागात जलसंधारणाची चळवळ अधिक व्यापक करणे,लोकसहभाग वाढविणे आणि पाण्याची बचत करणे हा अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ङ्गगाळमुक्त धरण,गाळयुक्त शिवारफ या उपक्रमामुळे दीर्घकालीन फायदे झाल्याचेही यांनी सांगितले.

### प्रथम पंधरा सहभागींचा गौरव

"महा वॉकॅथॉन – वॉक फॉर वॉटर'मधील प्रथम दहा सहभागी विजेत्यांना मानचिन्ह प्रमाणपत्र,पदक देऊन अध्यक्ष तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभि. देवेंद्र रोडगे यांनी केले,तर आभार अभि.आदित्य राऊळवार यांनी मानले. पाणी आणि मातीचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, हा संदेश या वॉकॅथॉनच्या माध्यमातून गोंदियाकरांना प्रत्यक्ष सहभागातून अधोरेखित केला.

## जाळीसह बदामाचे झाड लांबवले

**तिरोडा**:शहर हिरवेगार आणि सुंदर बनवण्यासाठी अहोरात्र धडपडणाऱ्या सामाजिक संस्थांच्या प्रयत्नांवर चोरट्यांनी पाणी फेरल्याचा धक्कादायक प्रकार तिरोड्यात उघडकीस आला आहे. शहरातील अत्यंत गजबजलेल्या आणि पोलीस ठाण्याजवळील मुख्य चौकातून चोरट्यांनी चक्क लोखंडी जाळीसह ९ फूट उंचीचे बदामाचे झाडच लांबवले आहे. या घटनेमुळे शहराच्या हरित संकल्पनेला मोठा धक्का बसला असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.पर्यावरण संवर्धनासाठी ङ्गग्रीन फाउंडेशन तिरोडाफ ही संस्था गेल्या ८०४ दिवसांपासून दररोज उपक्रम राबवत आहे. संस्थेने आतापर्यंत शहरात सुमारे ३ हजारांहून अधिक झाडांची लागवड करून त्यांचे जतन केले आहे.

# गोंदियात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने पहिली दत्तक प्रक्रिया पूर्ण; दोन बालकांना मिळाला हक्काच्या कुटुंबाचा आधार



**गोंदिया:-** आई–वडिलांचे छत्र हरवलेल्या आणि मायेच्या उबेपासून वंचित असलेल्या दोन चिमुकल्यांच्या आयुष्यात अखेर आशेचा नवा किरण उजाडला आहे. गोंदिया जिल्हा प्रशासनाच्या विशेष पुढाकारातून आसरा शिशुगृहातील दोन बालकांची दत्तकविधान प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. जिल्हाधिकारी मंदार पत्की यांच्या हस्ताक्षराने निर्गमित झालेल्या पहिल्याच दत्तक आदेशामुळे या दोन्ही बालकांना हक्काचे, सुरक्षित आणि प्रेमळ कुटुंब मिळाले आहे.

केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दत्तक प्रक्रियेतील किचकट कायदेशीर विलंब टाळण्यासाठी न्यायालयाऐवजी जिल्हाधिकाऱ्यांकडे हे अधिकार वर्ग करण्यात आले आहेत. या नव्या नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी करत गोंदिया जिल्ह्यात ही पहिली वहिली ऐतिहासिक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. दत्तक ग्रहण नियमावली २०२२ आणि बाल न्याय अधिनियम २०१५ अंतर्गत ऑनलाइन व अत्यंत पारदर्शक पद्धतीने हा निर्णय घेण्यात आला.

**"अनाथ व निराधार बालकांचे पुनर्वसन हा केवळ प्रशासकीय सोपस्कार नसून बालकांच्या भविष्याला आकार देणारा मार्ग आहे. पात्र व इच्छुक दाम्पत्यांनी कायदेशीर आणि अधिकृत मार्गानेच दत्तक प्रक्रियेत सहभाग घ्यावा."**

**मंदार पत्की, जिल्हाधिकारी, गोंदिया**

### जिल्हाधिकारी झाले भावूक!

प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी दोन्ही बालकांना प्रेमाने आपल्या कुशीत घेतले. बालकांच्या चेहऱ्यावरील निष्पाप हास्य पाहून जिल्हाधिकारी कार्यालयातील वातावरण काही काळ अत्यंत भावूक झाले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी बालकांची विचारपूस करत दत्तक पालकांशी संवाद साधला आणि दोन्ही कुटुंबांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### विविध यंत्रणांचा समन्वय

ही संपूर्ण प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनिकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे, मुकेश पटले, आचल फुलेकर, डॉ. सचिन उईके तसेच केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (उअठअ) व राज्य दत्तक संसाधन प्राधिकरणाच्या टीमने विशेष परिश्रम घेतले.

# एमआयडीसीचे विश्रामगृह आणि सामाईक सुविधा केंद्र बेवारस; कोट्यवधींच्या मालमत्तेची दैना

**गोंदिया:-**एकीकडे जिल्ह्यात नव्या उद्योगांची वाणवा असताना, दुसरीकडे गोंदिया एमआयडीसीतील कोट्यवधी रुपयांच्या शासकीय मालमत्तेची प्रशासकीय दुर्लक्षामुळे धुळधाण उडाली आहे. एमआयडीसी परिसरातील विश्रामगृह (Rest House) आणि सामाईक सुविधा केंद्राची (CFC - Common Facility Centre) इमारत गेल्या अनेक वर्षांपासून पार बेवारस अवस्थेत पडून आहे. देखभालीअभावी या इमारतींची कमालीची दुरवस्था झाली असून, आज हे परिसर मद्यपी आणि समाजकंटकांचा अड्डा बनले आहे.

स्थानिक उद्योजक आणि नागरिकांना सोयी–सुविधा पुरवण्यासाठी लाखो रुपये खर्चून या इमारती उभारण्यात आल्या होत्या. मात्र, प्रशासनाच्या अनास्थेमुळे आज इमारतींमधील खिडक्या, दारे, वायरिंग आणि विजेचे महागडे साहित्य चोरीला गेले आहे. इमारतींच्या अवतीभवती झाडाझुडपांचे साम्राज्य पसरले असून, परिसरात दारूच्या बाटल्यांचा सडा आणि कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत. कोट्यवधींच्या या मालमत्तेचे रक्षण करण्यास एमआयडीसी प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरल्याचे चित्र आहे.



### उद्योगमंत्र्यांचे लक्ष जाणार का?

**राज्याचे औद्योगिक विकास मंत्री लवकरच गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर येवून गेले. औद्योगिकीकरणाच्या बाता मारणारे मंत्री महोदय एमआयडीसीच्या या दयनीय आणि बेवारस इमारतीची पाहणी करून अधिकाऱ्यांना झाडणार, की या दुरवस्थेकडे डोळेझाक करून सरळ निघून गेले.**

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन

**गोंदिया:-** "खेलेगा भारत, जीतेगा भारत" या संकल्पनेअंतर्गत राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन दिनांक २८ ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. यावर्षीचे अभियान "Tribute | Play | Move –अभिवादन । खेळ । सक्रिय हालचाल या तीन स्तंभांवर आधारित आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, क्रीडा संस्था, क्रीडा मंडळे तसेच विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांनी आपल्या स्तरावर राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन करावे, असे आव–हन करण्यात येत आहे.

कार्यक्रमांतर्गत मेजर ध्यानचंद यांना अभिवादन, क्रीडा स्पर्धा, "Ek Ghanta Khel Ke Maidan Mein" अंतर्गत किमान एक तास क्रीडा उपक्रम, पारंपरिक खेळ, मैत्रीपूर्ण सामने, फिटनेस उपक्रम, सायकल रॅली, वॉकेथॉन, रनिंग तसेच जनजागृतीपर उपक्रम आयोजित करता येतील.

विशेषतः दि.२९ ऑगस्ट रोजी "Ek Ghanta Khel Ke Maidan Mein" या उपक्रमांतर्गत विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी किमान एक तास क्रीडा उपक्रमात सहभागी होऊन राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करावा. तसेच दि.३० ऑगस्ट २०२६ रोजी "Secial Sundays on Cycle" अंतर्गत सायकल रॅली व विविध फिटनेस उपक्रमांचे आयोजन करून नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करावा.


## जिल्हा परिषद, गोंदिया
## (सार्वजनिक बांधकाम विभाग)
## जाहिरात (पहिली वेळ) सन २०२६–२७

सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया कार्यालया तर्फे जिल्हयातील विश्रामगृह नवेगावबांध,सालेकसा व मा. अध्यक्ष जि.प.गोंदिया यांचे निवासस्थान करीता तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी निवास स्थानकरिता,असे एकुण ०४ खानसामा (स्वयंपाकी) ची अनुभवी बाहय यंत्रणेच्या माध्यमाने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठी निविदा मागविण्यांत येत आहे.

मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या संस्थानी सदर जाहिरात प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक २१/८/२०२६ ते २८/४/२०२६ पर्यंत दुपारी ३.०० वाजे पर्यत सार्वजनिक बांधकाम विभागात निविदा मोहरबंद पाकीटात सादर करावी लागेल.

मनुष्यबळ पुरवठा करणाच्या संस्थांना त्यांनी दिलेली दरपत्रके, कारण न देता नाकारणे अथवा स्विकारणेचे अधिकार मुख्व कार्यकारी अधिकारी यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत. तसेच मनुष्यबळ पुरवठा करण्यासंबधी अटी व शर्ती कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येईल. मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या संस्थांना किमान कामाचा हक्क प्रस्थापित करता येणार नाही.

| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| **जेनित चंद्रा दोंतुला(भाप्रसे)** | **डॉ.तानाजी लोखंडे** | **प्रकाश ताकसांडे** | **उमेश पंधरे** |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अति.मुख्य कार्यकारी अधिकारी | कार्यकारी अभियंता | मुख्य लेखा वित्त अधिकारी |
| जिल्हा परिषद गोंदिया | जिल्हा परिषद गोंदिया | सा.बां.विभाग,जि.प.गोंदिया | जिल्हा परिषद गोंदिया |

क्र./संमावज/नाग/३७०/२०२६